रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १८ • अंक ३२
www.ramprahar.com

सोमवार १८ ऑगस्ट २०२५ • पाने ८ • किंमत ₹२

## उपराष्ट्रपतीपदासाठी राज्यपाल राधाकृष्णन यांना उमेदवारी



**नवी दिल्ली** : जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिल्यानंतर नवे उपराष्ट्रपती कोण होणार याकडे अनेकांच्या नजरा लागलेल्या आहेत. दरम्यान, उपराष्ट्रपतीपदासाठी भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) उमेदवार म्हणून महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. राधाकृष्णन हे गेल्या तीन दशकांपासून भाजपचे सक्रीय सदस्य आहेत. ते भाजपच्या तिकिटावर दोन वेळा तमिळनाडूच्या कोईंबतूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार म्हणून निवडून आले होते तसेच त्यांनी काही वर्षे तमिळनाडू भाजपचे प्रदेशाध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. २०२३मध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांची झारखंडच्या राज्यपालपदी नियुक्ती केली होती. त्यानंतर दीड वर्षाने त्यांच्याकडे महाराष्ट्रासारख्या बलाढ्य राज्याची जबाबदारी सोपवण्यात आली.

### अंतरंग

जोरदार पावसाचा मच्छीमारांनाही फटका; होड्या किनाऱ्यावर/२
मुरूडच्या नांदगावमध्ये मुस्लिम गोविंदांनी दिली सलामी/५
नव्या प्रकल्पांमुळे रोहा अष्टमीच्या सौंदयात भर/७

# रायगड जिल्ह्यातून एक लाखाहून अधिक बहिणींनी पाठवल्या देवाभाऊंना राख्या

## महिलांसाठी कौशल्य विकास योजना राबवणार –मंत्री मंगलप्रभात लोढा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिलांच्या सशक्तीकरणासाठी राज्य सरकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सातत्याने काम करत आहे. त्या अनुषंगाने महिलांसाठी अधिकाधिक कौशल्यविकास योजना राबविल्या जाणार असल्याची माहिती राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यतामंत्री मंगलप्रभात लोढा यांनी रविवारी (दि. १७) येथे दिली.

रक्षाबंधनानिमित्त देवाभाऊ अर्थात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उत्तर व दक्षिण रायगड जिल्ह्यातील एक लाखाहून अधिक बहिणींनी राख्या आणि त्यासोबत शुभसंदेश पाठविण्यात आले आहेत. पनवेल शहरातील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या सोहळ्यात या राख्या मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी स्वीकारल्या. राख्या व संदेश मंत्री लोढा यांच्यामार्फत देवाभाऊंकडे सुपूर्द करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करताना मंत्रीमहोदय बोलत होते.



मंत्री लोढा यांनी बोलताना, रायगड हा सक्रिय जिल्हा असल्याचे सांगितले. ते पुढे म्हणाले की, देवाभाऊ आणि लाडक्या बहिणींचे नाते अतूट आहे. त्यामुळे हा कार्यक्रम भावनिक असा आहे. महिलांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे यासाठी सरकारच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जातात. त्यानुसार महिला बचत गट आर्थिकदृष्ट्या बळकट झाले पाहिजेत यासाठी औद्योगिक प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून कौशल्य विकास विशेष कोर्स आयोजित केले जाणार आहेत. महिलांसाठी जास्त जास्त कार्यक्रम राबविण्यावर भर दिला जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले तसेच लोकनेते दि.बा. पाटील यांचे स्मरण करून विमानतळाला 'दिबां'चेच नाव मिळेल, असा विश्वास या वेळी व्यक्त केला.

मोदी सरकार व राज्य सरकारच्या योजना तळागाळात पोहचविण्याचे आणि सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून केले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी केंद्रात काम करत आहेत; त्याचप्रमाणे देवेंद्रजी राज्यात लोकाभिमुख काम करत आहेत आणि त्यानुसार राज्याचा विकास होत असून देवाभाऊंविषयी सर्वांना आदर आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

प्रास्तविकात उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी रक्षाबंधन उपक्रमाची माहिती दिली. बूथनिहाय संपर्क झाल्यावर बहिणींनी स्वेच्छेने राख्या पाठवल्या; त्याचबरोबर देवाभाऊंना शुभेच्छा देणारे संदेशही दिले असल्याचे सांगितले. दक्षिण रायगड महिला मोर्चा अध्यक्ष चित्रा पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. (पान २ वर..)

### देवाभाऊंनी राज्य आणि पक्षासाठी कष्ट उपसले –आमदार प्रशांत ठाकूर

आपल्या भाषणात आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले की, देवाभाऊंनी गावागावात घरोघरी पक्ष पोहचविण्यासाठी कष्ट उपसले आहेत. त्या अनुषंगाने प्रत्येक भागात भाजपची ताकद वाढली आहे. महिलांच्या उत्कर्षासाठी त्यांनी विविध योजना अमलात आणल्या. त्यामुळे लाडके देवाभाऊ आपल्या बंधूप्रमाणे असल्याची भावना त्यांच्या मनात आहे. म्हणूनच बहिणींनी आस्थेने देवाभाऊंना रक्षाबंधनानिमित्त राख्या पाठवल्या आहेत आणि त्या अनुषंगाने तेवढ्याच आत्मियतेने हा कार्यक्रम होत आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निरोगी शतायुष्य लाभो, अशा शब्दांत शुभचिंतन केले.

# प्रतिज्ञापत्र द्या; अन्यथा देशाची माफी मागा!

मुख्य निवडणूक आयुक्तांचे राहुल गांधींना आव्हान | पत्रकार परिषद घेत सर्व आरोपांचे खंडन



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

निवडणूक आयोग आणि मतदार यादीवरून जे आरोप लावण्यात आलेत, ते निराधार आणि खोटे आहेत. जर त्यांच्याकडे काही पुरावे असतील तर त्यांनी सात दिवसांत प्रतिज्ञापत्र सादर करावे; अन्यथा संपूर्ण देशाची माफी मागावी, असे आव्हान मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी काँग्रेस नेते व विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे नाव न घेता दिले आहे.

गेल्या काही दिवसांपासून राहुल गांधी यांच्याकडून निवडणूक आयोगाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. त्याबद्दल मुख्य निवडणूक आयुक्तांनी रविवारी (दि. १७) पत्रकार परिषद घेत आरोपांचे खंडन केले.

मतदार आपल्या आवडत्या नेत्याला मत देतो. लोकसभा निवडणुकीत मतदान प्रक्रियेत मोठी यंत्रणा कार्यरत असते. लाखो कर्मचारी यात असतात. या पारदर्शी प्रक्रियेत कोणी मतचोरी करू शकतो का, असा सवाल करून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार म्हणाले की, निवडणूक आयोग राजकीय पक्षांमध्ये भेदभाव करत नाही. आमच्यासाठी कोणीही विरोधी पक्ष नाही. सर्वजण समकक्ष आहेत. १८ वर्षांवरील प्रत्येक जण मतदान करू शकतो.

मतदानानंतर ४५ दिवसांत याचिका दाखल केली गेली नाही आणि आता मतचोरी असे शब्द वापरणे हा भारतीय संविधानाचा अपमान आहे. शिवाय पुरावे मागितल्यावर उत्तर दिले गेले नाही. त्यामुळे अशा आरोपांना आम्ही घाबरत नाही. निवडणूक आयोगाच्या खांद्यावर बंदूक ठेवून भारताच्या मतदारांवर निशाणा साधला जात असेल, तर सर्व मतदारांसोबत पहाडासारखा उभा आहे, अशा शब्दांत ज्ञानेशकुमार यांनी राहुल यांना सुनावले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर हे कर्णाचा अवतार, त्यांच्यासारखा दिलदारपणा मी कुणामध्ये पाहिला नाही!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे गौरवोद्गार



**सांगली : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे कर्णाचा अवतार आहेत. त्यांच्यासारखा दिलदारपणा मी कुणामध्येच पाहिला नाही. पैसे तर सगळेच कमावतात, मात्र ते देण्याची दानत ही फक्त रामशेठ ठाकूर यांच्यामध्ये आहे. त्यामुळे मी महाराष्ट्राच्या तमाम १३ कोटी जनतेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो, असे गौरवोद्गार राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगलीतील इस्लामपूर येथे काढले.



महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित प्रा.डॉ. एन.डी. पाटील विधी महाविद्यालय, श्रीमती सरोज पाटील मानसशास्त्र संशोधन केंद्र आणि डॉक्टर एन.डी. पाटील बहुउद्देशीय सभागृहाचे उद्घाटन शनिवारी (दि. १६) मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री पवार बोलत होते.

या सोहळ्याला सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील, खासदार धैर्यशील माने, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार रोहित पवार, दिवंगत प्रा. डॉ.एन.डी. पाटील यांच्या पत्नी व संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

या वेळी प्रा.डॉ. एन.डी. पाटील बहुउद्देशीय सभागृहासाठी जिल्हा योजना अनुदानातून १० कोटी रुपये देण्याचे आश्वासन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. त्याचप्रमाणे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी एक कोटी रुपयांची, तर आमदार रोहित पवार यांनी ४० लाख रुपयांची देणगी जाहीर केली.

आपल्या भाषणात संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील यांनीही, लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणजे हिरा आहेत. एका अत्यंत गरीब कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांचा कमवा आणि शिका हा मंत्र घेऊन शिक्षण पूर्ण केले तसेच पुढे ते मोठे उद्योजक झाले. त्यांचे व्यक्तिमत्व अत्यंत प्रामाणिक, प्रेमळ आणि दयाळू असून त्यांनी १०० कोटीहून अधिक रुपये संस्थेला दिले आहेत. त्यामुळे रामशेठ ठाकूर हे रयत शिक्षण संस्थेला लाभलेले रत्न आहेत, असे गौरवोद्गार काढले. (पान २ वर..)

# उरणच्या महारोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

## आमदार महेश बालदी यांच्या उपक्रमाचे मान्यवरांकडून कौतुक

**उरण : वार्ताहर**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने भारतीय जनता पक्ष उरणच्या वतीने बेरोजगारांसाठी महारोजगार मेळाव्याचे आयोजन शहरातील डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी शाळा, पेन्शनर पार्क येथे रविवारी (दि. १७) करण्यात आले होते. या मेळाव्यास उमेदवार तरुण-तरुणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

मेळाव्याचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे आदी उपस्थित होते.

या रोजगार मेळाव्यात नामांकित ३० कंपन्या सहभागी झाल्या होत्या.





(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

दहावी, बारावी, आयटीआय, पदवीधर, पदव्युत्तर पदवीधर आणि अकुशल अशा विविध शैक्षणिक पात्रतेचे हजारो उमेदवार मेळाव्यात सहभागी झाले. अनेक उमेदवारांनी आधीच ऑनलाइन अर्ज भरले होते. मेळाव्यात घेण्यात आलेल्या मुलाखतींमध्ये ७२ उमेदवारांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ऑन द स्पॉट ऑफर लेटर देण्यात आले. यामुळे नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांना मोठा दिलासा मिळाला आहे. (पान २ वर..)

## निवडक

### देशातील पहिल्या आठ पदरी उन्नत महामार्गाचे उद्घाटन

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रविवारी (दि. १७) देशातील पहिल्या आठ पदरी उन्नत महामार्गाचे उद्घाटन करण्यात आले. गुरुग्राम ते दिल्ली आयजीआय विमानतळापर्यंत बांधलेल्या या द्वारका एक्सप्रेसवेसोबतच अर्बन एक्सटेंशन रोड-२ (यूईआर-२)चेही उद्घाटन करण्यात आले. आता नोएडातून विमानतळ हा प्रवास अवघ्या २० मिनिटांत होणार आहे. या कार्यक्रमास केंद्रीय रस्ते वाहतूक व परिवहनमंत्री नितीन गडकरी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

### ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार



**पुणे** : सिनेसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री ज्योती चांदेकर यांचे वयाच्या ६९व्या वर्षी अल्पशा आजाराने शनिवारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवारी (दि. १७) पुण्यातील नवी पेठ वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनीही अंत्यदर्शन घेतले. आपल्या आईला मुखाग्नी दिल्यानंतर ज्योती चांदेकर यांची मुलगी अभिनेत्री तेजस्विनी पंडित हिच्या अश्रूंचा बांध फुटल्याचे पहावयास मिळाले.

# कोल्हापूर सर्किट बेंचचे दिमाखात उद्घाटन



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूरसह सहा जिल्ह्यांनी उराशी जपलेले उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंचचे स्वप्न रविवारी (दि. १७) साकार झाले. सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत कोल्हापूर सर्किट बेंचचे उद्घाटन झाले.

या समारंभास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार धैर्यशील माने, शाहू महाराज, पालकमंत्री प्रकाश आबिटकर, इतर लोकप्रतिनिधी, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अलोक अराधे, कोल्हापूर सर्किट बेंचचे न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, न्यायमूर्ती शिवकुमार दिगे, न्यायमूर्ती शर्मिला देशमुख, न्यायमूर्ती एस.जी. चपळगावकर आदी उपस्थित आहेत. या सर्किट बेंचमुळे कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांतील नागरिकांचा न्यायदानाच्या प्रक्रियेतील सुलभता प्राप्त होणार आहे.

# पनवेलमध्ये आमदार चषक दहीहंडी उत्सवाचा थरार

## मैत्री गोविंदा पथकाने आठ थर रचून जिंकली मने

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष पनवेल शहर मंडळाने आयोजित केलेल्या आमदार चषक दहीहंडी उत्सव २०२५मध्ये मैत्री गोविंदा पथकाने ऐतिहासिक कामगिरी करत पनवेलमध्ये प्रथमच आठ मानवी थरांचा मनोरा रचून हंडी फोडण्याचा मान पटकावला. शहरातील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहासमोर आयोजित केलेल्या या दहीहंडी उत्सवात गोविंदा पथकांसह नागरिकांचा प्रचंड उत्साह दिसून आला.

या उत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. त्यांनी गोविंदा पथकांना शुभेच्छा देऊन त्यांचा उत्साह वाढवला.



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

या दहीहंडी उत्सवाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे पाच लाख ५५ हजार ५५५ रुपयांचे मोठे बक्षीस ठेवण्यात आले होते. अनेक गोविंदा पथकांनी आकर्षक मानवी मनोरे रचून हंडीला सलामी दिली. येथे सर्वात जास्त आठ थर रचण्याचा मान मैत्री गोविंदा पथकाला मिळाला. त्यांच्या या थरारक आणि विक्रमी कामगिरीने उपस्थितांची मने जिंकली.

या उत्सवाला भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, उपाध्यक्ष जयंत पगडे, सुनील घरत, माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका प्रीती जॉर्ज, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, भाजप अनुसूचित सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, शिवानी घरत, पनवेल मंडळ अध्यक्ष तथा आयोजक सुमित झुंझारराव, अमित ओझे, रूपेश नागवेकर, केदार भगत, प्रवीण मोरबाळे, प्रशांत शेट्ये, महेश राऊळ यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या नियोजनबद्ध उत्सवामुळे पनवेल शहरातील संस्कृती आणि एकोपा पुन्हा एकदा दिसून आला.

# जोरदार पावसाचा मच्छीमारांनाही फटका

## ◆ होड्या किनाऱ्यावर; आवक घटल्याने मासळीचे भाव वधारले



**मुरुड : प्रतिनिधी**

कोकणातील ७२० किलोमीटर सागरी किनाऱ्यावर मागील दोन दिवस पासून जोरदार पाऊस पडत आहे. त्यामुळे छोट्या बोटीने मासेमारी करणाऱ्या बोटी किनारीवर परतल्या आहेत. मासळीचा खूप चांगला हंगाम सुरू असताना मागील काही दिवसापासून मुसळधार पावसाचे संकट कोसळले आहे.

सुरुवातीच्या काळात ओले बोंबील व कोळंबी याची मोठी आवक झाली होती. तदनंतर काही दिवसांनी पापलेटसुद्धा मोठ्या पट्टीत सापडले होते. त्यामुळे मासेमारीला सुगीचे दिवस आले होते असे वाटत असताना अचानक ऑगस्ट महिन्यात पावसाने जोर पकडला. वास्तविक पहाता जुलै महिन्यात बेसुमार पाऊस पडत असतो, परंतु यंदा मात्र जुलै महिन्यात कमी पाऊस पडून ऑगस्ट महिन्यात पाऊस जास्त पडत आहे. मुसळधार पावसाने मासेमारीवर त्याचा विपरीत परिणाम होऊन छोट्या बोटी किनाऱ्यावर आलेल्या आहेत. आता या बोटी पाऊस थांबण्याची वाट पहात आहेत.

पाऊस थांबताच पुन्हा या बोटी खोल समुद्रात जाऊन जोमाने मासेमारी करणार आहेत. मुरुड तालुक्यात सुमारे ६४० होड्या असून यातील मुसळधार पावसामुळे किनारा गाठला आहे. मुसळधार पावसामुळे मासळी मार्केट मध्ये मासळीची आवक घटल्याने मासे महाग झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. पापलेट, सुरमई, रावस या मासळीचे भाव खूप वाढले आहेत. सध्या कोलंबी व ओले बोंबील लोकांना परवडेल अश्या भावात मिळत आहे.

पावसाचा जोर कमी झाला की, पुन्हा मासेमारी जोरदार सुरू होऊन मासळी मुबलक मिळाल्यास चविष्ठ मासे माफक दरात मिळतील असा येथे अंदाज व्यक्त केला जात आहे. सर्व मच्छिमार आता पाऊस थांबण्याची वाट पहात आहेत. पाऊस थांबताच पुन्हा जोमाने मासेमारी सुरू होणार आहे.

# अलिबागमध्ये गावदेवी पथकाची हॅट्ट्रिक

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग शहरात आयोजित करण्यात आलेलेल्या दहीहंडी उत्सवात गोंधळपाडा येथील गावदेवी गोविंदा पथकाने अलिबाग शहरातील प्रतिष्ठेच्या तीनही दहीहंडी फोडून हॅट्ट्रिक केली.

गोंधळपाडा येथील गावदेवी गोविंदा पथक मागील काही वर्षांपासून अलिबाग तालुक्यात नवीन विक्रम करत आहे. त्यांनी आठ थरांची सलामी दिली होती. यंदा त्यांनी आठ थरांची सलामी दिलीच शिवाय शहरातील तीन प्रतिष्ठेच्या दहीहंडी फोडण्याचा विक्रम केला.



प्रशांत नाईक मित्र मंडळाच्या वतीने अलिबाग नगरपालिका येथे आयोजित दहीहंडी उत्सवात पुरुषांची मानाची दहीहंडी गावदेवी गोविंदा पथक गोंधळपाडाने ७ थर रचून फोडली. अलिबाग तालुका भाजपतर्फे भाजप जुन्या कार्यालयाजवळ बांधण्यात आलेली दहीहंडी फोडण्याचा मान देखील गावदेवी पथकाने मिळवला.

स्व. मधुशेठ ठाकूर सामाजिक संस्थेतर्फे शिवाजी पुतळा येथे बांधण्यात आलेली दहीहंडीदेखील गावदेवी गोविंदा पथकाने फोडून अलिबाग शहरातील तीनही प्रतिष्ठेच्या दहीहंडी फोडून हेटट्रिक केली. पेझारी येथील राजधानी रायगड दहीहंडी मरुआई मेटपाडा गोविंदा पथकाने सात मानवी मनोरे रचून फोडली.

अलिबाग तालुक्यात आयोजित केलेल्या या प्रमुख चारही दहीहंडी स्पर्धांमध्ये गावदेवी गोविंद पथक गोंधळपाडा यांनी तीन दहीहंडी फोडून वर्चस्व राखले. गावदेवी गोंधळपाडा पथक मागील काही वर्षांपासून नवनवीन विक्रम करत आहे. सर्व दहीहंडी कार्यक्रमांना चांगला प्रतिसाद मिळाला.

# ऐतिहासिक तलवारीचे आज मुंबईत होणार जोरदार स्वागत

**मुंबई : प्रतिनिधी**

श्रीमंत राजे रघूजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार सोमवारी (दि.१८) मुंबईत दाखल होणार असून महाराष्ट्र शासनातर्फे मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर जोरदार स्वागत होणार आहे. तर संध्याकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकार्पण सोहळा पार पडेल.

श्रीमंत राजे रघूजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार महाराष्ट्र शासनाने लिलावात जिंकली असून नुकतीच सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी लंडन येथे ही तलवार ताब्यात घेतली, १८ ऑगस्टला ती मुंबईत दाखल होईल. विमानतळ प्राधिकरणाकडून आंतरराष्ट्रीय विमानतळ सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार सकाळी १० वाजता ही ऐतिहासिक तलवार स्वीकारतील. त्यानंतर विमानतळावरी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन बाईक रॅली काढून चित्ररथावर विराजमान करुन ही तलवार पु. ल. देशपांडे कला अकादमीकडे नेण्यात येईल.

दरम्यान, संध्याकाळी ६ वाजता सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय सांस्कृतिक कार्य संचालनालय, पु.ल. देशपांडे कला अकादमी तर्फे सेना साहेब सुभा पराक्रम दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात श्रीमंत राजे रघूजी भोसले यांच्या ऐतिहासिक तलवार प्रदर्शनाचे उदघाटन व लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होईल.

श्रीमंत सेना साहेब सुभा रघुजीराजे भोसले यांच्या इंग्लंडमधून आलेल्या तलवारीचे व बारा वारसा मानांकित गडकिल्ल्यांच्या माहितीचे प्रदर्शन, १९ ते २५ ऑगस्ट २०२५, सकाळी ११ ते सायं ७ दरम्यान, पुल देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई येथील कला दालनात सुरू राहणार आहे. हे प्रदर्शन सर्वांनसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

# वैकुंठ पाटील मित्र मंडळातर्फे एक लाखाच्या चार दहीहंड्या

**पेण : प्रतिनिधी**

आपण नेहमीच पाहत असतो मुंबईसारख्या ठिकाणी दहीहंडीसाठी आठ, नऊ आणि दहा थर लावण्यात येत असतात. त्याचा आनंद आपण मोबाईल आणि टीव्हीवर पाहून घेत असतो. तोच थरार आणि आनंद ग्रामीण भागातील माझ्या नागरिकांना लुटता यावा याच उद्देशाने या दहीहंडीचे आयोजन केल्याचे भाजप दक्षिण रायगड महामंत्री वैकुंठ पाटील यांनी तांबडशेत येथील वैकुंठदादा पाटील मित्र मंडळाच्या दहीहंडी कार्यक्रमावेळी बोलताना सांगितले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वैकुंठ दादा पाटील मित्र मंडळाने दहीहंडीचे आयोजन केले होते पण यावर्षी १,११,१११ रुपयांच्या एक नव्हे तर चार दहीहंड्या वेगवेगळ्या ठिकाणी लावण्यात आल्या होत्या. यामध्ये हमरापुर विभागात तांबडशेत, वाशीनाका, वडखळ आणि नागोठणे या भागातील गोविंदा पथक आणि नागरिकांनी या दहीहंडींचा मनमुराद आनंद लुटला.

तांबडशेत येथील वैकुंठदादा मित्र मंडळाच्या दहीहंडीचा थरार व आनंद नागरिकांना याची देही याची डोळा पहावयास मिळाला. या वेळी म्हैसबाड येथील रुद्रावतार गोविंदा पथकाने ६५ सेकंदामध्ये सात थर लावले तर विठाबाई खारपाले गोविंदा पथकाने फक्त ३८ सेकंदात सात थर लावून मानाची हंडी फोडण्याचा मान पटकावला. विठाबाई खारपाले गोविंदा पथकाने सलग तिसऱ्यांदा वैकुंठदादा मित्र मंडळाची दहीहंडी फोडून आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. यावेळी त्यांना भाजप दक्षिण रायगड महामंत्री वैकुंठ पाटील व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते एक लाख ११ हजार रोख रक्कम व चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

वैकुंठदादा मित्र मंडळ तांबडशेत येथील दहीहंडीला अनेक गोविंदा पथकांनी सलामी दिली. ज्या गोविंदा पथकाने पाच थरांच्यावर सलामी दिली त्यांना दहा हजार व ज्या गोविंदा पथकांनी तीन व चार थरांची सलामी दिली त्यांना पाच हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले.

या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे महिलांनी सहभाग घेऊन थर लावून दहीहंडी फोडण्याचा मनमुराद आनंद घेतला. तसेच या कार्यक्रमामध्ये ग्रुप डान्स ठेवण्यात आले होते. तसेच पारंपारिक नाच गाणी असल्याने नागरिकांना त्यांचा आस्वाद झाला.

या कार्यक्रमावेळी रायगड दक्षिण भाजप महामंत्री वैकुंठ पाटील, शर्मिला पाटील, वासुदेव म्हात्रे, दिनेश पाटील, शशिकांत भगत, काशिनाथ पाटील, अभय म्हात्रे, गोपीनाथ मोकल,नितीन मोकल, आर. बी. पाटील, आदिनाथ पाटील, मोहन पाटील, चंद्रकांत पाटील, संजय डंगर, विजय पाटील, गणेश पाटील, अमित पाटील, दीपक मोकल, प्रदीप म्हात्रे, सतीश पाटील, भरत पाटील, हेमंत जैन आदींसह मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय पाटील व परमेश पाटील यांनी केले.



# श्री कृष्ण जन्माष्टमी सोहळा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नील हॉस्पिटल येथे श्री कृष्ण जन्माष्टमी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी प्रसिद्ध स्त्रीरोग, कॅन्सर आणि गर्भसंस्कार तज्ज्ञ शुभदा नील यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

पनवेल सांस्कृतिक संघ अध्यक्ष गोखले, लायन्स क्लब सरगम पनवेलचे अध्यक्ष बहिरा, ॲड डॉ देशपांडे, लायन मिलिंद जोशी, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा अंजली, सचिव अंजली, नयना बांठिया, डॉ. नीलेश बांठिया, किशोर मोरे, महावीर इंटरनॅशनलचे सपन बर्धन, मणिकेशा एज्युकेशनल फाउंडेशन संचालिका अंजनी सराफ, शिवसेना महिला खारघर प्रमुख चंचला बनकर आणि नील हॉस्पिटल स्टाफ इतर मान्यवर उपस्थित होते.

श्रीकृष्ण जयंतीनिमित्त हाच दिव्य संदेश आहे की आपण आपल्या जीवनात श्रीकृष्णांनी बाळगलेली मूल्ये आणि गुण रुजवण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि गीतेत वर्णन केल्याप्रमाणे माणसात लपलेल्या शत्रूंचा नाश केला पाहिजे. तरच आपण छोट्या छोट्या गोष्टींवरून प्रत्येक घरात सुरू असलेले महाभारत संपवू शकू आणि तेव्हाच श्रीकृष्ण जयंतीचा उत्सव अर्थपूर्ण होईल.

# स्वातंत्र्यदिनी अलिबाग येथे वृक्षारोपण

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी विठ्ठल दिव्यांग बहुउद्देशीय संस्था, प्रबुद्ध फाउंडेशन आणि ज्येष्ठ नागरिक परहुरपाडा यांच्या संयुक्त विद्यमानाने परहुपाडा अलिबाग येथे शिव छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगन येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

परहुपाडा गावातील मागील दोन वर्षात मृत पावलेल्या व्यक्तीच्या स्मरणार्थ त्याची आठवण म्हणून त्याच्या नावे एक झाड लावण्यात आहे. विशेष म्हणजे ही वृक्षारोपण करण्यासाठी स्थानिक तसेच मुंबई, नवी मुंबई येथून अपंग बांधव या कार्यक्रमासाठी आले होते. विशेष बाब म्हणजे हे वृक्षा रोपण अपंग बांधवाच्या आणि ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. या मध्ये क्रिकेट मैदानाच्या सभोवताली वृक्षा रोपण करण्यात आले. या मध्ये बदा, काजू, बेल, आवळा या प्रकारची झाडे लावण्यात आली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विठ्ठल दिव्यांग संस्थेचे संस्थेचे अध्यक्ष सुहास बुरुमकर, सचिव भालचंद्र चाचले, राजेश वारेकर, रुपेश राणे, राजेश राणे, प्रबुद्ध फाउंडेशनच्या अध्यक्ष सुवर्णा गजभिये तसेच ज्येष्ठ नागरिक जनार्दन घरत, विलास खोपकर हरिश्चंद्र खोपकर, शशिकांत खोपकर, मुकुंद नाईक, विनोद मोरे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यास मेहनत घेतली. आमदार महेंद्र दळवी यांचे विशेष सहकार्य लाभले.

या कार्यक्रमासाठी मुंबई वरून आलेल्या दिव्यांग बांधवांची राहण्याची मोफत व्यवस्था बाल यशोदा कॉटेजचे मालक प्रशांत जयराम नाईक यांनी उत्तम प्रकारे केली आणि जेवणाची व्यवस्था कोकण कट्टाचे मालक नंदकुमार भगत यांनी केली.



## दुखवटा

### संगीता जमदाडे

**चौक :** रायगड जिल्हा चर्मकार संघटनेचे जिल्हा अध्यक्ष राजेंद्र नारायण जमदाडे व रवींद्र नारायण जमदाडे यांच्या आईचे निधन झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. ह.भ.प.वैकुंठवासी संगीता (ताई) नारायण जमदाडे (वय ७२) यांचे निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुलगे, एक मुलगी, नातू, नाती, सुना, भाऊ, भाचे आहेत. ताई बाय या नावाने पंचक्रोशीत त्यांची ओळख होती. त्यांचे उत्तरकार्य शनिवारी २३ ऑगस्ट रोजी सारंग या गावी होणार आहेत.



### अंजली जोगत

**नागोठणे :** के.एम.जी.विभागातील गवळआळी मधील होतकरू तरुण, नागोठणे विभागात प्रसिद्ध असलेले प्रसाद डेकोरेटर्सचे मालक प्रसाद जोगत व शेखर जोगत यांच्या मातोश्री अंजली गणपत जोगत (वय ७२) यांचे १५ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या अंतविधी प्रसंगी ग्रामस्थ, आप्तेष्ट, मित्रपरिवार बहुसंख्येने उपस्थित होते. कै. अंजली जोगत यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि.२४) नागोठणे येथे व उत्तरकार्य सोमवारी (दि.२५) गवळआळी येथील राहत्या घरी होणार असल्याची माहिती जोगत कुटुंबियांकडून देण्यात आली आहे.



### भिकूशेठ धाडवे

**माणगाव :** तालुक्यातील मूठवली तर्फे निजामपूर गावचे रहिवासी तथा पाणसई ग्रामपंचायतीचे माजी सरपंच कै.भिकूशेठ तुकाराम धाडवे यांचे शनिवारी (दि.१६) निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय ५९ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मोठा भाऊ, एक बहीण, तीन मुलगे, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. भिकूशेठ धाडवे यांचा दशक्रिया विधी सोमवारी (दि.२५) तर उत्तरकार्य विधी (बारावे) मंगळवारी (दि.२६) मूठवली तर्फे निजामपूर येथे होणार आहे.



### प्रभाकर उभारे

**माणगाव :** तालुका पंचायत समितीचे माजी सभापती कै.प्रभाकर बाळाराम उभारे (वय ७०) यांचे रविवारी (दि.१७) पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन लहान भाऊ, चार बहिणी, एक मुलगा, एक मुलगी, जावई, सून, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. कै.प्रभाकर उभारे यांचा दशक्रिया विधी व उत्तरकार्य विधी दोन्ही एकाच दिवशी मंगळवारी (दि.२६) माणगाव येथे होणार आहे.



पान १ वरून

## रायगड जिल्ह्यातून एक लाखाहून अधिक बहिणींनी पाठवल्या देवाभाऊंना राख्या

या कार्यक्रमास उत्तर रायगड भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, जिल्हा उपाध्यक्ष अश्विनी पाटील, प्रल्हाद केणी, मयुरेश नेतकर, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, खालापूर पूर्व मंडळ अध्यक्ष सनी यादव, खोपोली मंडळ अध्यक्ष राहुल जाधव यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, महिला मोर्चाच्या पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## लोकनेते रामशेठ ठाकूर हे कर्णाचा अवतार, त्यांच्यासारखा दिलदारपणा मी कुणामध्ये पाहिला नाही!

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, डॉ. एन.डी. पाटील आणि सरोज पाटील यांनी माझ्यावर भरपूर प्रेम केले असून रयत शिक्षण संस्था ही माझी मातृसंस्था आहे. त्यामुळे संस्थेला जी काही मदत लागेल ती मी सर्वतोपरी करेन, असा शब्द दिला.

कार्यक्रमाला बार कौन्सिल ऑफ इंडियाचे सदस्य आशिष देशमुख, कोल्हापूर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, शिक्षण संचालक डॉक्टर शैलेंद्र देवळाणकर, सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, शिक्षण विभागाचे विभागीय सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव, महेश चोथे यांच्यासह विविध क्षेत्रातील पदाधिकारी आणि मान्यवरांची उपस्थिती होती.

## उरणच्या महारोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

या वेळी बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आमदार महेश बालदी यांच्या कार्याचे कौतुक केले. आमदार महेश बालदी यांनी हाती घेतलेले काम चांगलेच होते. त्यामुळे त्यांच्या पुढाकाराने आयोजित केलेल्या या रोजगार मेळाव्यातून परिसरातील इच्छुक उमेदवारांना काम मिळेल, असे ते म्हणाले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले की, आमदार महेश बालदी यांचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. चांगले काम कसे करावे, कामाची आखणी कशी करावी हे त्यांना अवगत आहे. त्यांनी हाती घेतलेले काम उल्लेखनीय असते. रोजगार मेळाव्याच्या स्तुत्य उपक्रमाबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी, आमदार महेश बालदी यांनी चांगले काम केले आहे. येथे मुलाखत दिलेल्या उमेदवारांना रोजगार मिळेल. मुलाखत देताना आत्मविश्वास पाहिला जातो. तो वाढवा. पुढे काही अडचण आल्यास सहकार्य करू, असे सांगितले.

या मेळाव्याला भाजपचे राज्य परिषद सदस्य रवी भोईर, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उरण तालुका ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, उरण शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, माजी जि. प.सदस्य राजेंद्र पाटील, ज्ञानेश्वर घरत, जीवन गावंड, कामगार नेते सुधीर घरत, सुरेश पाटील, जितेंद्र घरत, जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत, मेघनाथ तांडेल, सीमा घरत, माजी नगरसेवक कौशिक शाह, राजेश ठाकूर, नवीन राजपाल, माजी नगरसेविका जान्हवी पंडित, प्रियांका पाटील, रजनी कोळी, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, शहराध्यक्ष संपूर्णा थळी, युवा मोर्चा शहराध्यक्ष निलेश पाटील, भाजप तालुका उपाध्यक्ष पंडित घरत, सरचिटणीस सुनील पाटील, राजू ठाकूर, हितेश शाह, मनन पटेल, अतुल ठाकूर, शैलेश गावंड, प्रतिक गोंधळी, मेघनाथ तांडेल, सुशांत पाटील, अनंत घरत, कुणाल शिसोदिया, गौरव कोळी, देवेंद्र घरत, संदीप पानसरे, शमिता ठाकूर, सुप्रिया म्हात्रे, संगीता पाटील, गौरी मंत्री यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, उमेदवार मोठ्यरा संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### कळंबोली वसाहतीतून तरुण बेपत्ता

**पनवेल :** कळंबोली वसाहतीमध्ये राहणाऱ्या तरुणाने मुंबई येथे जातो असे सांगून राहत्या घरातून निघून गेलं तो



अद्याप घरी न परतल्याने तो हरवल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सगीर सिददीक खान (वय २४) असे या तरुणाचे नाव असून त्याची उंची ५ फुट, रंग-सावळा, चेहरा गोल, नाक सरळ, डोक्याचे केस काळे, दाढी-बारीक, अंगात नेसणीस पिवळया रंगाचा टी शर्ट निळया रंगावी जिन्स पॅन्ट पायात चप्पल, सोबत मोबाईल फोन आहे. त्याला हिंदी भाषा अवगत आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोलीस हवा एस.व्ही. मासुळ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अल्पवयीन मुलीचे अपहरण

**पनवेल :** १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आजीवली येथील जितेंद्र सिंग यांच्या मुलीचे अज्ञात व्यक्तीने अपहरण केले. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करत आहेत. या मुलीचा रंग गोरा, उंची पाच फूट, डोळे काळे आहेत. तिने अंगात पांढऱ्या रंगाचा पंजाबी ड्रेस परिधान केला असून लाल रंगाची चप्पल घातली आहे. तिला मराठी भाषा बोलता येते. या मुलीबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस उपनिरीक्षक गणेश मोकाशी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नशामुक्तीसाठी कळंबोलीत जनजागृती

*पोलिसांची मोटरसायकल रॅली उत्साहात*




**कळंबोली : बातमीदार**

आजची तरुणाई नशेकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होत आहे. तरुणाईच्या नशा खोरीमुळे अनेक कुटुंब उद्ध्वस्त होत आहेत. याचे गांभीर्य ओळखून कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते पाटील यांच्या नेतृत्वाखाली कळंबोली पोलीस ठाणे हद्दीत नशा मुक्त अभियाना अंतर्गत कळंबोली पोलीस ठाणे परिसरात मोटर रॅलीचे आयोजन करून अमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहीम राबवण्यात आली.

यामध्ये पोलीस कर्मचाऱ्यांसह नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. कळंबोली पोलीस नशा मुक्ती समाजासाठी जपत असलेल्या सामाजिक बांधिलकीचे नागरिकांनी स्वागत करून धन्यवाद देण्यात आले. अमली पदार्थांचा विळखा हा तरुणाईला दिवसेंदिवस उध्वस्त करत आहे. पोलीस बांधव कायद्याच्या माध्यमातून अमली पदार्थ विरोधी कडक कारवाया हे सतत राबवत आहेत. अनेक ठिकाणी छापेमारी करून मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थांचा साठा हस्तगत करून त्याचा नायनाटही केला जात आहे. तरीसुद्धा अमली पदार्थ बाबत जनजागृती करून तरुणांमध्ये अमली पदार्थ विरोधी अभियान राबवून अमली पदार्थांपासून दूर राहण्याचे आवाहन कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांच्याकडून केले जात आहे.

समाजामध्ये अमली पदार्थ विरोधी जनजागृती होण्यासाठी कळंबोली पोलीस ठाण्याकडून मोटर सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदरची मोटरसायकल रॅली वसाहती मधील अग्निशमन दल चौक-करवली चौकी -केल २ नाका -सेंट जोसेफ हायस्कूल सेक्टर ५ हनुमान मंदिर सेक्टर २ जाधव वाडी- सुधागड स्कूल सेक्टर १ कळंबोली पोलीस स्टेशन अशी मार्गस्थ करण्यात आली. या वेळी मोटर रॅलीच्या दुतर्फा नागरिकांनी उभे राहून तिचे स्वागत करून पोलीस बांधवांना धन्यवादही दिले.

या वेळी पोलीस बांधवांच्या हातामध्ये विविध फलक हे नागरिक आणि तरुणांचे लक्ष वेधून घेत होते. या फलकांमधील मजकूरा मध्ये फक्त एक चूक आणि आयुष्यभर पश्चाताप, SAY छ्ज तो DRUGS, नशा नाही, दिशा हवी ', अंमली पदार्थ पासून दूर राहा आयुष्य सुंदर करा, ड्रग्स पासून दूर राहा असे विविध संदेश प्रसिद्ध करण्यात आले होते. या मोटरसायकल रॅलीमध्ये ८ पोलीस अधिकारी व ३५ अमलदार सहभागी झाले होते.

नशा मुक्त अभियाना अंतर्गत कळंबोली पोलीस ठाणे हद्दीत माऊली फाउंडेशन च्या वतीने आयोजित दहीहंडी मध्ये अमृता खानविलकर, सिने अभिनेत्री यांच्या मदतीने तसेच डिजिटल स्क्रिनवर नशा मुक्त अभियानाचे विविध संदेश दाखवून नशा मुक्त अभियानाची माहिती देण्यात आली व व्यसनापासून दूर राहण्याबाबतचा संदेश देण्यात आला.

> **"आजच्या तरुण पिढीने सजग राहून समाज जीवनात वावरले पाहिजे. आपल्या आजूबाजूला घडत असलेल्या घडामोडींबाबत शाळा, महाविद्यालय, पोलीस प्रशासन व आपल्या कुटुंबाशी संवाद साधला पाहिजे व अमली पदार्थाबाबत माहिती मिळाल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधला पाहिजे. तरुण पिढीने अमली पदार्थापासून दूर राहून चांगले जीवन घडवावे व सशक्त भारताचे कणखर अन जागरूक नागरिक म्हणून राहावे. पोलीस प्रशासन सदैव आपल्या सोबत राहणार आहे.**
> **-राजेंद्र कोते पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कळंबोली**

# खानाव येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील खानाव येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सरपंच चंदा निलेश वारदे यांच्या नेतृत्वाखाली आणि इंडीयन रिलीफ फाउंडेशनच्या सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. या शिबिराला पनवेल आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांनी विविध आरोग्य तपासण्या केल्या. या वेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, संजय पाटील, पनवेल तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, शिवकर ग्रामपंचातीचे सरपंच आनंद दवळे, कामगार नेते रवी नाईक, जितेंद्र घरत, नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, पांडुरंग पाटील, रवींद्र कोरडे, उमेश वार्डे, सरपंच चंदा निलेश वारदे, युवा मोर्चाचे तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, माजी तंटामुक्ती अध्यक्ष दत्तात्रेय वारदे, उपसरपंच बाळाराम पाटील, लक्ष्मण पाटील, विठ्ठल पाटील, अनंता मुंडे, हरिचंर वारदे, मेघनाथ वारदे, रमेश वारदे, निलेश वारदे, रवींद्र पाटील, डॉ.विनय पादचदे, सिद्धेश काळे, भरत पाटील, सुभम सिंग, दिलिप मंगतानी, विकास वारदे, नरेश वारदे, सचिन दिसले, निलेश वारदे, उमेश वारदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# पनवेल महापालिका निर्मित आकांक्षित स्वच्छतागृहाचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मलनिस्सारण विभागातर्फे पनवेल शहरातील गार्डन हॉटेल येथील बस थांब्या शेजारी आकांक्षित स्वच्छता गृह उभारण्यात आले आहे. या आकांक्षित स्वच्छतागृहाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर तसेच आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

या वेळी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी नगरसेवक नितीन पाटील, अनिल भगत, अजय बहिरा, गणेश कडू, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज, रुचिता लोंढे आदी उपस्थित होते.

आमदार महोदयांनी केलेल्या विशेष मागणीनुसार या स्वच्छता गृहाची उभारणी करण्यात आली आहे. येत्या काळात आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका कार्यक्षेत्रात दहा ठिकाणी अशा प्रकारचे आकांक्षित स्वच्छता गृहे बांधण्यात येणार आहे.

महापालिकेच्या वतीने उप आयुक्त (आरोग्य) डॉ.वैभव विधाते व शहर अभियंता संजय कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या आकांक्षित स्वच्छता गृहांची उभारणी करण्यात आली आहे. हे बांधकाम पूर्ण होण्यासाठी मलनिस्सारण विभाग प्रमुख प्रीतम पाटील, शौचालय अधिक्षक भावेश चंदने, अभियंता प्रीतीश पगारे, मयूर शिरोळे, राकेश पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

महापालिकेच्या आतापर्यंतच्या सर्व स्वच्छता गृहांमध्ये सर्वात अत्याधुनिक असे हे स्वच्छता गृह, संपुर्णपणे स्वयंचलित स्वच्छता गृह, पुर्णवेळ केअरटेकर, संपुर्ण निःशुल्क, दिव्यागांनाही उपयुक्त ही आकांक्षित स्वच्छता गृहाची वैशिष्ट्ये आहेत.




**नवीन पनवेल : गोर बंजारा समाजाच्या वतीने तीज महोत्सवाचे आयोजन रविवारी करण्यात आले होता. यंदाचे हे या महोत्सवाचे ११वे वर्ष असून या महोत्सवाला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, गोर बंजारा समाजाचे पनवेल अध्यक्ष रूपेश चव्हाण, नायक शिवचंद राठोड, सचिव निलेश राठोड, पनवेलचे कारभारी शंकर चव्हाण, खजिनदार सुनील राठोड आदी उपस्थित होते.**



**पनवेल : वंदे मातरम जनरल कामगार संघटना आणि जय श्रीराम रिक्षा चालक मालक संघटना हरिग्राम यांच्या वतीने हरिग्राम रिक्षा नाका उभारण्यात आला आहे. या रिक्षा नाक्याचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, रायगड जिल्हा परिषदेचे परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, युवा मोर्चाचे तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, कामगार नेते जितेंद्र घरत, रवी नाईक, नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, पांडुरंग पाटील, रवींद्र कोरडे, उमेश वार्डे आदी उपस्थित होते.**

# पनवेल महानगरपालिकेतर्फे २१ ऑगस्टला विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेमार्फत येत्या २१ ऑगस्टला गुरुवारी ज्येष्ठ नागरिक दिन -कृतज्ञता संवाद दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनात आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दुपारी दोन ते सायंकाळी साडेसहा या वेळात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहेत. यात सुरुवातीला ज्येष्ठ नागरिकांची नोंदणी व प्राथमिक आरोग्य तपासणी शिबिराने कार्यक्रमाची सुरुवात होईल. त्यानंतर २१ ऑगस्ट हा अलमायझर दिन असल्याने अलझायमर्स संदर्भात डॉक्टरांचे माहितीपर व्याख्यान होणार आहे. त्यासोबतच कायदेविषयक सल्ला, जेष्ठ नागरिकांसाठी राज्य व केंद्र शासनाच्या ज्या विविध योजना आहेत त्या संदर्भातील माहितीपर व्याख्यान आयोजिले आहे. ज्येष्ठ वर्गाला होत असलेला सायबर धोका लक्षात घेता पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी यांचे ज्येष्ठांची सायबर फसवणूक संदर्भात चर्चासत्र व प्रश्नोत्तराचा कार्यक्रम होईल.

ज्येष्ठ मंडळीच्या सुप्त कला गुणांना वाव देण्यासाठी त्यांना हक्काचे व्यासपीठ देण्यासाठी, त्यांनीच बसवलेला विविध गुणदर्शन कार्यक्रम होईल. यात नृत्य, नाटक, गीत, मिमिक्री, नक्कल, काव्यवाचन एकपात्री अभिनय, अशा कला ज्येष्ठ नागरिक मंडळी सादर करतील, त्यांच्यासोबत सुसज्ज असा ऑर्केस्ट्राचा संच देखील असणार आहे. याखेरीस जेष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून दोन ज्येष्ठ नागरिक महिला, दोन पुरुष यांचा सत्कार केला जाईल.

या कार्यक्रमास पनवेल महानगरपालिका हद्दीतील ज्येष्ठ नागरिकांनी आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिका मार्फत करण्यात येत आहे. तसेच आपल्या उपस्थितीबाबतची, विविध गुणदर्शन कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुक ज्यष्ठ नागरिकांनी आपली नावे ७७१५८१५१२७ व ९३२१६७०७६९ या मोबाईल क्रमांकाच्या व्हॉटसअ‍ॅपवर २० ऑगस्ट रोजी संध्याकाळी सहा वाजे पर्यंत पाठवावीत, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात करण्यात येत आहे .



**उलवे नोड : भाजप उलवे नोड २ उपाध्यक्ष अनंता ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त गव्हाणचे माजी उपसरपंच तथा उलवे नोड २ अध्यक्ष विजय घरत, माजी ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, वामन म्हात्रे, जयवंत देशमुख, विश्वनाथ कोळी, व्ही. के.ठाकूर, गोपाळ भगत, सुहास भगत, भाऊ भोईर, संदीप म्हात्रे, मधुकर पाटील, अंकुश ठाकूर आदींनी शुभेच्छा दिल्या.**

# सैनिक हो तुमच्यासाठी ग्रुपद्वारे दिवाळी फराळ उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

भारत विकास परिषद पनवेल शाखेतर्फे सैनिक हो तुमच्यासाठी २०२५ दिवाळी फराळ उपक्रम आपण सुरू करत करण्यात आले असून या उपक्रमात सर्वांनी शभंगाची व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

सैनिक हो तुमच्यासाठी या ग्रुप द्वारे आपण पनवेलकर सलग ६ वर्षे सैनिकांप्रती असलेल्या अभिमान आणि आदर भावनेने जोडले आहेत. सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सामूहिक व प्रामाणिक प्रयत्न आहे. त्यामुळे सर्वांच्या योगदानामुळे आणि सहकार्यामुळे २०२० या वर्षी १४००० लाडू पासून सुरुवात करून २०२४ या वर्षी आपण एकूण १२००० फराळ डबे पाठविण्यात यशस्वी झालो. मागच्या वर्षी एकूण १५०० किलो चिवडा, १५०० किलो शेव, १५०० किलो शंकरपाळे, १२०० किलो चकली आणि ४८००० लाडू पाठविण्यात आले. दरम्यान भारत विकास परिषद पनवेल शाखेतर्फे सैनिक हो तुमच्यासाठी २०२५ दिवाळी फराळ उपक्रम आपण सुरू करण्यात आला आहे.

त्यामुळे आपल्या शूरवीर भारतीय जवानांना दिवाळीनिमित्त फराळ पाठविण्यासाठी आपले योगदान https://pages.razorpay.com/sainikhopanvel यावर जमा करावे, असे आवाहन करण्यात आले आहेत. ही देणगी इन्कम टॅक्स नियमानुसार ८०G खाली करमुक्त असेल. तसे प्रमाणपत्र भारत विकास परिषद संस्थेतर्फे देण्यात येईल. यावर्षी दिवाळी ऑक्टोबर महिन्यात असल्याने १३ सप्टेंबरपासून फराळ पॅकिंग साठी सुरुवात होणार आहे. अशी माहिती भारत विकास परिषद पनवेल शाखेचे नितीन कानिटकर यांनी केले आहे.

## संपादकीय

# न्यायदानाचे नवे पाऊल

लोकशाहीप्रधान देशात शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहचणे महत्त्वाचे आहे, कारण लोक, समाज सक्षम असेल तर त्यांच्याकडून होणारी निर्मितीही सशक्त होते. याच भूमिकेला अनुसरून कोल्हापूरसह सहा जिल्ह्यांसाठी साकारलेल्या उच्च न्यायालयाच्या सर्किट बेंचचे रविवारी उद्घाटन झाले. यामुळे पक्षकारांचे स्वप्न साकार झाले असून न्यायदानासाठी नवे पाऊल पडले आहे.

**कोल्हापूरला संघर्ष आणि न्यायाचीही मोठी परंपरा आहे. सामाजिक समतेचे पुरस्कर्ते, न्यायप्रिय म्हणून ओळख राहिलेले राजर्षी शाहू महाराजांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासून करवीर नगरीत न्याय, समता आणि शिस्तीला प्राधान्य दिलेले आहे. न्यायदान कोणत्याही भेदाशिवाय तसेच निकोप व समानतेच्या तत्त्वावर असावे हा संदेश छत्रपती शाहू महाराजांनी दिला होता. कोल्हापूरच्या सर्किट बेंचचा शुभारंभ हा त्यांच्या विचारांना खरे अभिवादन आहे, याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. कोल्हापुरात पूर्वी 'राजा ऑफ कोल्हापूर' या सहीने न्यायदान होत होते. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे कोल्हापूरला पहिले न्यायाधीश होते, तर राजाराम महाराजांच्या काळात कोल्हापुरात स्वतंत्र न्यायालय स्थापन झाले होते. अशा प्रकारे न्यायव्यवस्थेत कोल्हापूरचे योगदान मोठे आहे. कोल्हापुरात स्थापन झालेल्या मुंबई हायकोर्टाच्या सर्किट बेंचचा लाभ कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्यांना होणार आहे. याआधी या जिल्ह्यांतील नागरिकांना आपली प्रकरणे घेऊन मुंबईत यावे लागत होते. यात त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम यांचा अपव्यय होत असे. आता ही प्रकरणे कोल्हापुरातच चालवली जाणार असल्याने सर्वांसाठी एक चांगली सोय झाली आहे. कोल्हापूरसाठी सर्किट बेंचची मागणी सुमारे पाच दशकांपासून सुरू होती. वकील संघटनांनी, सामाजिक संघटनांनी, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी, स्थानिक लोकप्रतिनिधींनी आणि माध्यमांनी या मागणीसाठी सातत्याने प्रयत्न केले. २०१४मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनीही ही मागणी कायम ठेवली. त्यांच्याच कार्यकाळात मागणी पूर्ण होऊन खंडपीठाचे उद्घाटन झाले आहे. हा सोहळा ज्यांच्या हस्ते झाला ते भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई महाराष्ट्राचे सुपुत्र आहेत हाही एक छान योगायोग जुळून आला. त्याचप्रमाणे इतर मान्यवर, लोकप्रतिनिधी उपस्थित होते. सर्वांनी हे खंडपीठ व्हावे याकरिता आग्रही भूमिका घेतली. त्यामुळेच देशाचे सरन्यायाधीश व अन्य मान्यवर जेव्हा कोल्हापूरच्या भूमीमध्ये दाखल झाले तेव्हा त्यांचे अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. विमानतळावर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांनी स्वागत केले. त्यानंतर ताराराणी चौकात कोल्हापूरवासीयांकडून पुष्पवृष्टी करून विशेष स्वागत करण्यात आले. कोल्हापूरसाठी जो विश्वास दाखवला त्याबद्दल विनम्रतेची ही भावना होती. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला संविधान दिले. याच संविधानाच्या जोरावर न्यायव्यवस्था बळकट होत आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या विद्यमान नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि गोवा खंडपीठासोबत आता कोल्हापूरचे सर्किट बेंच न्यायव्यवस्थेत नवे स्थान घेणार आहे. राज्य सरकारने शासन आपल्या दारी हा उपक्रम राबविला. आता कोल्हापूर खंडपीठाच्या निमित्ताने न्याय आपल्या दारी ही संकल्पना सत्यात उतरली आहे.**

# 'स्मार्ट'द्वारे शेतकऱ्यांची आत्मनिर्भरता



लहान आणि सिमांत शेतकरी तसेच कृषी नवद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून शेतमालाच्या सर्वसमावेशक आणि स्पर्धात्मक मूल्यसाखळ्यांच्या विकासासाठी मदत करण्याच्या उद्देशाने राज्यात जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाचा लाभ घेवून शेतीक्षेत्रात सकारात्मक बदल निर्माण करणारे चित्रही दिसून येत आहे. कांचनी कंपनी त्याचे एक प्रातिनिधीक उदाहरण होय. स्मार्ट योजनेंतर्गत राज्यात सुरू झालेल्या एकूण १४ जिनिंगपैकी कांचनी हा राज्यातील पहिला जिनिंग ठरला. शासकीय योजनेचा फायदा घेतांना शेतकऱ्यांनी एकत्र येवून शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन केली आणि थेट पिकांची मुल्यसाखळी निर्माण करून कच्च्या मालावरील प्रक्रीयेद्वारे मध्यस्थांकडे जाणारा पैसा स्वत:कडे वळविला. शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी घेतलेला पुढाकार व त्यातून ग्रामीण अर्थव्यस्थेला मिळालेली चालना आणि शेतकऱ्यांची आत्मनिर्भरता म्हणजे चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील कांचनी शेतकरी उत्पादक कंपनी.

या कंपनीने कापसावर प्रक्रिया करून थेट चीन, व्हिएतनाम आदी देशांमध्ये कापसाच्या गाठी निर्यात केल्या. या प्रकल्पास सहसंचालक कृषी नागपूर कार्यालयाद्वारे बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प योजनेंतर्गत ५ कोटी अर्थसहाय्य मंजूर झाले असून ३ कोटी वितरीत करण्यात आले. शेतकऱ्यांची एकजूट आणि शासनाची भरघोस साथ यामुळे कंपनीने वर्षाकाठी १०० कोटींची उलाढाल गाठली आहे. विभागातील तुमसर, कन्हानसह कामठी येथील अंतरंग या शेतकरी उत्पादक कंपन्यांनीही कांचनी कंपनीच्या पाऊलावर पाऊल ठेवत गतीने वाटचाल सुरू केली आहे.

अल्पभूधारक शेतकऱ्यांना वर्षभर मेहनत करून त्याच्या शेतमालास योग्य तो भाव मिळत नाही यावर उपाय म्हणून शेतकऱ्यांनी एकत्र येत रितसर नोंदणी करून २०१७मध्ये कांचनी शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना केली. राज्य शासनाकडून स्मार्ट प्रकल्पांतर्गत मिळालेल्या पाच कोटींच्या अनुदानातून कॉटन जिनिंग एंड प्रेसिंग युनिट टाकण्यात आले. २४ डीआर जिनिंग व प्रेसिंग युनिट तसेच क्लिनिंग आणि रिडींग शेडची बांधणी करण्यात आली. याद्वारे शेतकऱ्यांना त्यांच्या कच्च्या कापसावर प्रक्रिया करून त्याच्या गाठी बनवून देण्यात आल्या व यातून त्यांना जास्त आर्थिक लाभ मिळाला. सुरूवातीला या कंपनीने सोयाबीन, हरभरा, तुर या पीकांची ट्रेडींग सुरू केली.

२०२३मध्ये ३५० शेतकऱ्यांना ९०० कापसाच्या गाठी तयार करून देण्यात आल्या. वर्षाकाठी जवळपास ९५ हजार क्विंटल कापूस शेतकऱ्यांनी या जिनिंगला आणला व त्यापासून १८.५ हजार गाठी बनविल्या आहेत. आर्थिक वर्ष २०२४-२५मध्ये जवळपास एक लाख ८० हजार क्विंटल शेत माल सांघिक रित्या गोळा करून अंदाजे आठ हजार शेतकऱ्यांना या विक्री व्यवस्थेचा लाभ दिला आहे. हरभरा बिजोत्पादनाच्या माध्यमातून २५० शेतकऱ्यांना प्रति क्विंटल बाजारभावापेक्षा ११०० रूपये जास्त भाव दिला आहे, हे सर्व शेतकऱ्यांच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत समाधानकारक चित्र आहे.

शेतकरी हा व्यापारी व्हावा या उद्देशाने कांचनी कंपनीची वाटचाल सुरू आहे. या कपंनीमुळे आता शेतकऱ्यांना दलाली दयावी लागत नाही व त्यांच्या उत्पन्नातून पैसेही कपात होत नाही. सांघिक विक्री व्यवस्था निर्माण करून शेतकऱ्यांच्या उत्पादनाला बाजारपेठेत जास्तीत-जास्त दर मिळून देण्यात येतो. शेतकऱ्यांच्या सक्रीय सहभागातून त्यांना बाजारपेठेशी जोडले जात आहे. दोन हजारपेक्षा जास्त शेतकरी सदस्य असणाऱ्या या कपंनीद्वारे शेतकऱ्यांना वेळेत शेतमालाचा मोबदला देण्यात येतो. चंद्रपूर, यवतमाळ व गडचिरोली जिल्ह्यातील ५२ शेतकरी कंपन्यांनी तूर, हरभरा, हळद, भात, सोयाबीन आणि कापसाच्या गाठी अन्य राज्यांमध्ये विक्री करून देण्यासाठी कांचनी कंपनी सोबत सामंज्यस करार केला आहे. कंपनी त्यांना चांगले खरीददार शोधून देते व त्याचा कसलाही मोबदला घेत नाही. वखार महामंडळातर्फे येथे तारण सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. शेतमालाच्या काढणी पश्चात व्यवस्थापन व प्राथमिक प्रक्रियेद्वारे मुल्यवृद्धी करण्यात येत आहे व ग्राहकांसाठी सुरक्षित खाद्य उत्पादित होत आहे.

कांचनी सोबतच नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यातील कन्हान येथे गट शेती आणि स्मार्ट प्रकल्पांतर्गत शेतकरी प्रगतीची कास धरत विकासाच्या मार्गावर अग्रणी झाले आहेत. २०१८मध्ये २० शेतकऱ्यांनी एकत्र येत कन्हान ग्रोव्हिजन कंपनी स्थापन केली. यामाध्यमातून राईस मिल सुरू केला. शासनाच्या मदतीने प्रगती पथावर आरूढ झालेल्या या कंपनीला स्मार्ट प्रकल्पाने एक नवी दिशा दिली. २०२४ मध्ये या प्रकल्पांतर्गत ८७ लाखांचे अनुदान मिळाले यातून व्हिट क्लिनिंग एंड ग्रेडिंग मशीन, गोदाम, यंत्र बांधणीसाठी गव्हाचे शेड, ६० मेट्रिक टन क्षमतेचा धरमकाटा आदी साहित्य खरेदी केली. याद्वारे भोपाळ येथील आयटीसी कंपनीला मालाचा पुरवठाही होत आहे. ३१२ शेतकरी या प्रकल्पाशी जोडले असून गव्हाचे बिजोत्पादन घेण्याचा मानस त्यांनी बोलून दाखविला आहे. येत्या काळात हाच या कंपनीच्या यशाचा मार्ग शेतकऱ्यांनी ठरवला आहे.

राज्यात अल्प व अत्यल्प भूधारकांची संख्या अधिक असल्याने त्यांना संघटित करून शेतकऱ्यांचे गट व कंपन्या स्थापन करणे, गट शेतीवर भर देणे आणि त्या माध्यमातून शेतमालाचे एकत्रिकरण करून शेतकऱ्यांचा बाजार संपर्क वाढविण्यासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येतात. स्पर्धात्मक शेतमाल मूल्य साखळ्यांच्या विकासाला मदत करण्याच्या उद्देशाने नागपूर विभागात स्मार्ट प्रकल्पांतर्गत कृषि विभागामार्फत शेतकऱ्यांच्या समुदाय आधारीत संस्था (कम्युनिटी बेस ऑर्गनायजेशन-सीबीओ), शेतकरी उत्पादक कंपन्या उभारण्यात येत आहेत. या शेतकरी संघांना नवीन संघटीत बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी आवश्यक ते तांत्रिक सहाय्य, पायाभूत सुविधा आणि जोखीम निवारण क्षमता विकसित करण्यासाठी प्रकल्पामार्फत अनुदान देण्यात येत आहे.

नागपूर विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयामार्फत विभागातील सहा जिल्ह्यांमधील एकूण ७९ शेतकरी समुदाय आधारित संस्थांना (सीबीओ) मंजुरी देण्यात आली आहे. विभागात वर्धा जिल्ह्यात एकूण १० सीबीओंना मंजुरी देण्यात आली आहे. नागपूर जिल्ह्यातील १५, भंडारा जिल्ह्यातील ११, गोंदिया जिल्ह्यातील १४, चंद्रपूर जिल्ह्यातील २२ आणि गडचिरोली जिल्ह्यातील सात सीबोओंचा यात समावेश आहे. या प्रकल्पांना स्मार्ट अंतर्गत १७२.०५ कोटींची रक्कम मंजूर करण्यात आली, तर १०३.०२ कोटींचे अनुदान वितरीत करण्यात आले.

यापूर्वी राज्यात जागतिक बँक (आयबीआरडी) सहाय्यीत महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या दोन प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी झाली. या धर्तीवरच जागतिक बँकेने राज्य शासनाला स्मार्ट प्रकल्पासाठी अर्थसहाय्य करण्याचा निर्णय घेतला आहे. स्मार्ट प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक गटांची निर्मिती व त्यांच्या सक्रिय सहभागाद्वारे शेतकऱ्यांना बाज़ारपेठशी जोडणे, शेतमालाचे काढणी पश्चात व्यवस्थापन व प्राथमिक प्रक्रियेद्वारे मुल्यवृद्धी करणे, ग्राहकांसाठी सुरक्षित खाद्य उत्पादित करण्यास मदत करणे आणि या सर्व उपक्रमांद्वारे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करून त्यांच्यासाठी उपजिविकेचे स्त्रोत निर्माण करण्यात येत आहे.

राज्याच्या कृषी व ग्रामीण उपजिविका क्षेत्रामध्ये स्मार्ट उपाययोजना राबवून राज्यात परिवर्तन घडविण्यासाठी जागतिक बँक व केंद्र शासनाच्या सहकार्याने ही योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये जागतिक बँकेकडून ७०%, राज्य शासनाचा हिस्सा २७%, तर खाजगी उद्योगक्षेत्राच्या माध्यमातून (सीएसआर) ३% रक्कम पुरविली जात आहे. प्रकल्पाची एकूण किंमत २ हजार १०० कोटी रुपये एवढी आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी कृषी, पशूसंवर्धन, पणन, सहकार, महिला व बाल कल्याण, ग्राम विकास व नगर विकास या सात प्रशासकीय विभागांच्या अकरा यंत्रणा मिळून हा प्रकल्प राबवित आहेत. शेतकऱ्यांच्या जीवनात यामुळे सकारात्मक परिवर्तन घडून येत आहे.

**-रितेश मो. भुयार, माहिती अधिकारी**

## बदलते तंत्रज्ञान



# एआयला मातृत्व भावनेने प्रशिक्षण द्या; अन्यथा...

जगभरात वेगवेगळ्या क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर झपाट्याने वाढताना पाहायला मिळत आहे. एआयच्या वाढत्या वापराबाबत अनेकांनी यापूर्वी चिंता व्यक्त केल्या आहेत, पण जेव्हा स्वतः एआयचे गॉडफादर मानला जाणारा व्यक्ती याबद्दल इशारा देतो, तेव्हा त्याची दखल घेणे आवश्यक ठरते. एक मोठे कंप्युटर शस्त्रज्ञ जेफ्री हिंटन यांनी भविष्यातील एआय चॅटबॉट्सना कशा प्रकारे प्रशिक्षित करणे आवश्यक आहे याबद्दल मत व्यक्त केले आहे. त्यांनी भविष्यातील प्रगत एआय प्रणाली मातृत्व भावनेसह डिझाइन केल्या गेल्या पाहिजेत असे सुचवले आहे.



लास वेगास येथील Ai४ परिषदेत बोलताना हिंटन यांनी नियंत्रण आणि दडपशाही याच्यामध्यमातून एआयवर वर्चस्व टिकवून ठेवण्याचे धोरण फेटाळून लावले. एआयची प्रगती ज्या वेगाने होत आहे ती पाहता ही रणनिती कुचकामी आहे असा युक्तीवाद त्यांनी केला. याच्या एवजी त्यांनी नवीन संकल्पना सादर केली, त्यांनी सुचवले की मानव-एआय संबंध हे आई आणि तिचे मुल यांच्या धर्तीवर असले पाहिजेत.

योग्य मॉडल आहे ज्याचे आपल्याकडे एकमेव उदाहरण आहे ज्यामध्ये एक कमी बुद्धिमान गोष्ट अधिक बुद्धिमान गोष्टीवर नियंत्रण ठेवते, ते म्हणजे आई जी तिच्या मुलाकडून नियंत्रित केली जाते. असे हिंटन म्हणाले, जर ते माझे पालनपोषण करणार नसेल, तर ते माझी जागा घेईल,असेही त्यांनी पुढे बोलताना सांगितले. यामध्ये संकल्पना अशी आहे की, जसे एक मूल ज्याची बुद्धिमत्ता मर्यादित आहे, ते त्याच्या अधिक बुद्धिमान आईकडून मार्गदर्शन आणि काळजी करवून घेऊ शकते, त्याचप्रमाणे मानवतेची काळजी एका अतिबुद्धिमान एआयकडून घेतली जाऊ शकते. मानवांसाठी तंत्रज्ञान सुरक्षित ठेवण्यासाठी हिंटन यांनी सुचवले की मानवतेने पूर्णपणे एआयला स्मार्ट बनवण्यावर लक्ष दिले पाहिजे याबरोबरच एआयला 'मातृत्वाची वृत्ती (रींशीपरश्र ळपीींळपलीं)' दिली पाहिजे, जेणेकरून ते खऱ्या अर्थाने आपल्याबद्दल, त्यांच्या मुलांची काळजी करेल, असेही ते म्हणाले. हिंटन यांनी युक्तीवाद केला की आपल्याला एआय असिस्टंट पेक्षा एआय मदर्सची गरज आहे. त्यांनी आधी दिलेल्या उदाहरणाचा संदर्भ देत हिंटन म्हणाले की एका असिस्टंटला तुम्ही कामावरून काढू शकता. सुदैवाने, तुम्ही तुमच्या आईला कामावरून काढू शकत नाहीत.

# लढावू स्वातंत्र्यसैनिक नेताजी सुभाषचंद्र बोस

नेताजी म्हणून प्रसिद्ध असलेले सुभाषचंद्र बोस हे एक महान लढाऊ, स्वातंत्र्यसैनिक आणि देशभक्त होते. जेव्हा आपण सुभाषचंद्र बोस हे नाव ऐकतो तेव्हा आपल्या मनात पहिली गोष्ट येते ती म्हणजे तुम मुझे खून दो में तुम्हे आझादी दूंगा ही त्यांची लोकप्रिय म्हण. आज त्यांचा स्मृतिदिन, त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...



## निमित्त

स्वातंत्र्य चळवळीचे महान नेते सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिसातील कटक येथील प्रसिद्ध वकील जानकी नाथ आणि प्रभावती देवी यांच्या पोटी झाला. इंग्रजांच्या दडपशाहीच्या निषेधार्थ त्यांच्या वडिलांनी 'रायबहादूर' ही पदवी परत केली. त्यामुळे सुभाषच्या मनात इंग्रजांबद्दल कटुता रुजली. आता सुभाष यांनी इंग्रजांना भारतातून हुसकावून लावण्याची आणि भारताला स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा घेतली आणि राष्ट्रवादाच्या मार्गावर चालू लागले. आयसीएस परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सुभाष यांनी आयसीएसचा राजीनामा दिला. या गोष्टीवर त्यांच्या वडिलांनी त्यांचे मनोबल वाढवले आणि सांगितले 'तुम्ही देशसेवेचे व्रत घेतले आहे, तेव्हा या मार्गापासून कधीही विचलित होऊ नका.'

डिसेंबर १९२७मध्ये काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस बनल्यानंतर १९३८मध्ये त्यांची काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाली. ते म्हणाले होते, महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली आपण स्वातंत्र्यासाठी लढले पाहिजे ही माझी इच्छा आहे. आमचा लढा केवळ ब्रिटीश साम्राज्यवादाविरुद्ध नाही, तर जागतिक साम्राज्यवादाविरुद्ध आहे, मात्र हळुहळू सुभाष यांचा काँग्रेसशी भ्रमनिरास होऊ लागला.


१६ मार्च १९३९ रोजी सुभाष यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. स्वातंत्र्य चळवळीला नवा मार्ग देत सुभाष यांनी तरुणांना संघटित करण्याचा प्रयत्न पूर्ण निष्ठेने सुरू केला. त्याची सुरुवात ४ जुलै १९४३ रोजी सिंगापूर येथे झालेल्या 'भारतीय स्वातंत्र्य परिषदे'ने झाली.

५ जुलै १९४३ रोजी 'आझाद हिंद फौज'ची औपचारिक स्थापना झाली. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी नेताजींनी आशियातील विविध देशांमध्ये राहणाऱ्या भारतीयांची परिषद भरवून आणि तात्पुरते स्वतंत्र भारत सरकार स्थापन करून स्वातंत्र्य मिळवण्याचा आपला संकल्प पूर्ण केला.

१२ सप्टेंबर १९४४ रोजी रंगूनच्या ज्युबली हॉलमध्ये हुतात्मा यतिंद्र दास यांच्या स्मृतीदिनानिमित्त नेताजी यांनी अतिशय भावविभोर भाषण केले आणि ते म्हणाले 'आता आपले स्वातंत्र्य निश्चित आहे, परंतु स्वातंत्र्य बलिदानाची मागणी करते. तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देईन.' भारताच्या इतिहासातच नव्हे; तर जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेलेले हे वाक्य देशातील तरूणाईत प्राण फुंकणारे होते.

१६ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजींचे विमान टोकियोला निघताना तायहोकू विमानतळावर कोसळले आणि १८ ऑगस्ट १९४५ रोजी स्वतंत्र भारताच्या अमरत्वाची घोषणा करणारे, भारतमातेचे लाडके नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे निधन झाले, परंतु देशभक्तीचा दिव्य प्रकाश प्रज्वलित करून अमर झाले. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# रात्री झोप येण्यासाठी 'या' गोष्टी कराव्यात

झोप ही आपल्या दैनंदिन जीवनातील सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे. झोप पूर्ण झाल्यावर शरीर, मन ताजेतवाने राहते, मात्र अनेक वेळा झोप पूर्ण झाल्यानंतरही शरीरात थोडीशी सुस्ती राहते. काही जणांना झोपण्यासाठी खूप मेहनत करावी लागते. बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स कॅम्पमध्ये काम करणारे स्पोर्टस् फिजिओथेरपिस्ट डॉक्टर सुधांशु राय यांनी काही उपाय सुचवले आहेत, जे कदाचित तुम्हाला मदत करू शकतील.



रात्री कॉफी पिऊ नका - दुपारी १२ नंतर कॉफी अजिबात पिऊ नका. कॅफिनचे आयुष्य ५ ते ६ तास असते. तुम्ही दुपारी ३ नंतर घेतलेली कॉफी तुमच्या झोपेच्या वेळेत, मेलाटोनिनच्या उत्पादनात व्यत्यय आणू शकते.

स्क्रीन टाइम - रात्री ८.३०नंतर टीव्ही, मोबाईल, लॅपटॉप बघू नका. फोनमधून येणारा निळा प्रकाश मेलाटोनिन सोडण्यात अडथळा आणतो. त्यामुळे ठरावीक वेळेनंतर रात्री मोबाईल, टीव्ही, लॅपटॉप न बघणे तुमच्या मेंदूला नैसर्गिकरीत्या विश्रांती घेण्यास मदत करील.

रात्री १ केळी + १ चमचा तूप खा - केळ्यामध्ये मॅग्नेशियम, ट्रिप्टोफॅन (मेलाटोनिन व सेरोटोनिन) भरपूर प्रमाणात असते आणि तूप रक्तातील साखर स्थिर करण्यास मदत करते. त्यामुळे रात्रीच्या वेळी तुम्हाला झोपेतून जागे करणाऱ्या कॉर्टिसोलच्या वाढीस प्रतिबंध घालता येतो.

विपरीत करणी आसन - विपरीत करणी आसन म्हणजे पाय भिंतीला टेकवून ठेवणे. हे आसन शरीराचा पॅरासिम्पेथेटिक मज्जासंस्था सक्रिय करते, हृदय गती कमी करते व मन शांत ठेवते. क्लिनिकल चाचण्यांमधून असे दिसून आले आहे की, हे आसन केल्याने झोप यायला लागणारा वेळ कमी होतो आणि चांगली झोप लागते.

नैसर्गिक वातावरणातील आवाज ऐका - अभ्यासातून असे दिसून आले आहे की, नैसर्गिक वातावरणातील सौम्य आवाज झोपेत अडथळा येऊ देत नाहीत.

खोलीचे तापमान - २४ अंश सेल्सिअस असे थंड वातावरण तुमच्या शरीराचे मूळ तापमान कमी करण्यास मदत करते. शरीराद्वारे मेलाटोनिन सोडण्यासाठी आणि गाढ झोपेसाठी हा एक नैसर्गिक उपाय आहे.

७:३०पर्यंत जेवा - उशिरा जेवण केल्याने इन्सुलिन आणि मेलाटोनिनच्या वेळेत व्यत्यय येतो. लवकर जेवल्याने तुमच्या सर्केडियन बायोलॉजीशी जुळतो आणि चांगली झोप येईल.

## निवडक

### तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**मोहोपाडा :** तुराडे आदिवासीवाडी येथे राहणारा सुनील काळूराम वाघमारे याने तुराडे आदिवासी येथील धापड्याची माळ येथील करंजाच्या झाडाला नॉयलॉनच्या रस्सीने गळफास घेवून आत्महत्या केली. त्याची काहीएक हालचाल होत नसल्याचे त्यास ग्रामीण रूग्णालय चौक येथे दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मयत घोषित केले. याबाबत रूपेश काळूराम वाघमारे याने रसायनी पोलीस ठाण्यात खबर दिली असून आकस्मात मृत्यू बीएनएस १९४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रमोद जाधव अधिक तपास करीत आहेत.

### चौक गावात पुन्हा घरफोडी

**खोपोली :** तालुक्यातील चौक पोलीस दूर क्षेत्र हद्दीत चार दिवसात दुसरी घरफोडी झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण झाले आहे. १४ ऑगस्ट रोजी ११वाजणेच्या सुमारास चौक बाजारपेठ येथिल महावीर टिंबर्स, येथे गोडावुन जवळील बाथरुमची लोखंडी खिडकी चोरटयांनी उपकुन त्या खिडकीवाटे गोडावुन मध्ये शिरले. गोडावुन मधील घराचे पाठीमागील दरवाजा तोडून घरात प्रवेश करुन घरातील बेडरुम मधील कपाटातील चांदीचे कळस, चांदीचे नारळ असा एकूण ३७हजार रुपये किंमतीचा ऐवज घरफोडी चोरी करुन नेले. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल पवार हे करीत आहेत.

### टेंभरी ग्रामपंचायतीतर्फे गुणगौरव

**चौक :** ग्रुप ग्रामपंचायत टेंभरी हद्दीत शासकीय योजना, माझी वसुंधरा अभियान, शैक्षणिक यंत्रणा व अन्य सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास सरपंच रमेश गायकवाड, उपसरपंच अपर्णा पवार, ग्राम पंचायत अधिकारी गोकुळदास राठोड आदी उपस्थित होते.



# रोहा तहसील येथील शौचालयाची दुरवस्था

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तहसीलदार कार्यालय हे नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामांसाठी प्रमुख केंद्र आहे. रोज शेकडो नागरिक येथे गर्दी करतात, मात्र याच परिसरातील सार्वजनिक शौचालयांची अवस्था पाहून नागरिक संताप व्यक्त करत आहेत. समोर रोहा पोलीस स्टेशनचे मुख्य कार्यालय आहे तिथेही असंख्य नागरिक रोजच्या रोज ये जा करत असतात.

शौचालयाभोवती वाढलेली झुडपे, आतून अस्वच्छता, पाण्याचा अभाव, दुर्गंधी व दुर्लक्षलेली देखभाल यामुळे हे शौचालय वापरणे म्हणजे अक्षरशः शिक्षा ठरत आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह येणाऱ्या नागरिकांना यातून मोठा त्रास सहन करावा लागत असून प्रशासनाची ही बेफिकिरी व निष्काळजीपणा सर्रास चर्चेत आहे, मात्र स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, तहसीलदार कार्यालयासारख्या महत्त्वाच्या ठिकाणी अशी घाणेरडी अवस्था असणे लाजिरवाणे आहे. नागरिक कर वेळेवर भरतात पण प्रशासन मूलभूत सुविधा द्यायला तयार नाही. ही जनतेचा अपमान करणारी बाब आहे.

सार्वजनिक ठिकाणी स्वच्छ भारत अभियानाचे फलक लावले जातात, कार्यक्रम साजरे केले जातात, परंतु प्रत्यक्षात स्थिती मात्र अत्यंत बिकट आहे. शौचालयांची अशी दुरवस्था राहिली, तर रोगराई पसरण्याची आणि नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.



## पेणमध्ये विशेष मुलांसाठी दहीहंडी

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरातील आई डे केअर संस्थेच्या विशेष (गतिमंद) विद्यार्थ्यांकरीता सामाजिक कार्यकर्ते राजू पिचिका निवास प्रांगणात दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने बाळगोपाळांना आकर्षक टी–शर्ट, पॅन्ट तसेच खाऊ व बक्षिसे देण्यात आली.

भर पावसात ६९ विशेष मुले गोविंदाच्या गाण्यांच्या तालावर नाचत– गात सहभागी झाली आणि निरागस हास्याने वातावरण आनंदमय केले. गेल्या १४ वर्षांपासून राजू पिचिका यांच्या माध्यमातून आई डे केअर संस्थेला सातत्याने मदत व सहकार्य मिळत असून संस्थेच्या उपक्रमांना बाळ मिळत आहे असे



संस्थापिका स्वाती मोहिते यांनी या वेळी सांगितले.

या कार्यक्रमाला पेणचे उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, राजू पिचिका आदी मान्यवर उपस्थित होते.

## नांदगावमध्ये मुस्लिम गोविंदांनी दिली सलामी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील नांदगावमध्ये शनिवारी झालेल्या गोपाळकाळा नांदगावच्या नाक्यावरील मानाच्या दहीहंडीला गावातील वरच्या मोहल्ल्यातील तरुण मुस्लिम गोविंदानी दिलेली सलामी यावर्षीच्या दहीहंडीतील विशेष आकर्षण ठरली. त्यातूनच नांदगावमध्ये धार्मिक एकोपा असल्याचे दिसून येत आहे.

सर्वधर्मसमभाव हे येथील गोपाळकाला उत्सवाचे पूर्वी पासूनचे वैशिष्ट्य असून येथील मुस्लिम तरुण दरवर्षी त्यात सहभागी होत असतात. यावर्षी वरच्या मोहल्ल्यातील तरुणांनी मोठ्या उत्साहात येथील नाक्यावर बांधलेल्या हंडीखाली उभे राहून चार थर लावून सलामी दिली तेव्हा उपस्थित सर्वांनी टाळ्या वाजवून त्यांना दाद दिली.

पुढीलवर्षी आम्हाला पंच कमिटी व नाक्यावरील मंडळाने परवानगी दिल्यास आम्ही हंडी फोडायला तयार आहोत असे प्रतिपादन शादाब हलडे यांनी या वेळी केले.



## माथेरानमध्ये पारंपरिक गोकुळाष्टमी आणि दहीकाला

**माथेरान : प्रतिनिधी**

पर्यटनस्थळ माथेरानमध्ये सलग सुट्ट्यांमुळे पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती, मात्र समस्त गावकरी दहीहंडी उत्सवात व आनंदात सहभागी झाले होते.

सर्वत्र गोकुळाष्टमीची धूम असताना माथेरान मध्ये हा सण जुन्या रूढी आणि परंपरनुसार ग्रामस्थ उसत्व मंडळाकडून साजरा करण्यात आला. श्रीराम मंदिर येथे कार्यक्रमांना सुरवात झाली. मंदिरातील भजन आटोपल्यावर ग्रामस्थ उत्सव मंडळाकडून मानाची दहीहंडी छोट्या बाळ गोपाळांकडून फोडण्यात आली. त्यानंतर सर्व मंडळाकडून दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम सुरू झाला. माजी शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या तर्फे श्रीराम चौक, नवरात्र उत्सव मंडळ यांच्याकडून रेल्वे स्टेशन,पंचवटी मित्र मंडळ यांच्याकडून पंचवटी येथे, चर्मकार समाज यांच्याकडून संत रोहिदास नगर मध्ये तर रेल्वे स्थानकाच्या प्रवेश द्वाराजवळ दहीहंड्याचे आयोजन केले होते. येथील स्थानिक गोविंदा पथकांनी या सर्व हंड्या फोडल्या.

असंख्य पर्यटकांनी गाण्यांच्या तालावर ठेका धरत माथेरानकरांच्या उत्साहात आनंद घेतला. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थ उत्सव मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.




**उरण नगरपरिषद उरण**

**ता. उरण, जिल्हा रायगड, पिन कोड – ४००७०२**

Email ID : uranmunicipal@gmail.com दूरध्वनी क्रमांक : ०२२२७२२२३२०

**Uran Municipal Council**

**GENERAL ELECTION 2025 Year**

**PUBLIC NOTICE**

For the General Election of Uran Municipal Council to be held in the Year 2025, the programme for the publication of draft ward boundaries is as follow.

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of publishing Notification of the draft ward boundaries | Monday Date 18/08/2025 |
| 2 | Period for submitting objections & Suggestions (To be submitted to the Chief Officer Uran for Objections & Suggestion, in Election Office Uran) | Monday, Date 18/08/2025 to Sunday, Date 31/08/2025 (upto 3.00 p.m) |

Note: The Citizens who have filed Objections & Suggestion will be informed separately about the date of hearing.

Place - Uran
Date - 18/08/2025

**sd/-**
**(Sameer Jadhav)**
**Chief Officer,**
**Uran Municipal Council, Uran**


# संततधार पावसात गोविंदा उत्साहात!

## रोह्यात दहीहंडी स्पर्धेला जमली अलोट गर्दी



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहयात पारंपारिक पध्दतीने गोकुळाष्टमीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. रोहयात सततधार पाऊस सुरू होता, या पावसाने गोविंदा पथकांमध्ये जान आणली, हा पारंपारिक सण अतिशय आनंदात साजरा झाला.

शहरातील तिन्ही प्रमुख आळयांमधुन गोविंदा निघतो, दुपारनंतर एकामागुन एक असे ठरलेल्या क्रमाने हे गोविंदा रोहा बाजारपेठेत आले, येथील उंच दही हंडया फोडण्यात आल्या. आमदार महेंद्र दळवी युवा प्रतिष्ठानच्या दहीहंडी स्पर्धेला अलोट गर्दी झालेली.

रोहा तालुक्यात जवळपास १२४ दहिहंडयांचे आयोजन करण्यात आलेले. त्यामध्ये रोहा शहरात शुक्रवारी झालेली रोहा तालुका शिवसेना आणि आमदार महेंद्र दळवी युवा प्रतिष्ठानची दहीहंडी स्पर्धा, शनिवारी सायंकाळी होत असलेली माजी आमदार अनिकेत तटकरे मित्रमंडळाची दहीहंडी स्पर्धा, राममारुती चौकातील माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांची दहीहंडी आणि भाजपाचे रोशन चाफेकर यांच्या माध्यमातून तीनबत्ती नाका येथे आयोजित केलेली दहीहंडी या रोहयाच्या गोविदोत्सवाचे आकर्षण होत्या. शिवसेना रोहा तालुका प्रमुख ॲड. मनोजकुमार शिंदे आयोजित स्पर्धेत ८ थरांची सलामी रोठ खुर्द गावाने दिली.

दुपारनंतर गावातील प्रथे परंपरे प्रमाणे साईनाथ मित्र मंडळ मोरे आळी, त्यानंतर जय गिरोबा अंधार आळी व रोहयाचा राजा धनगर आळी हि गोविंदा पथके त्यात्या आळीतील ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शिस्तबध्दतेने एकामागुन एक असे बाजारपेठेत आल्या. येताना वाटेत विविध ठिकाणी बांधलेल्या दहीहंडया फोडुन या उत्सवाचा आनंद गोविंदांनी लुटला. गौरोबा नगर दमखाडी येथिल गोविंदा पथक आणि महात्मा फुले नगर, धाविर रोड येथिल संत रोहिदास गोविंदा पथक यांनी मुख्य हमरस्त्यावरील तीन बत्ती नाका पोलिस चौकी पर्यंत येत यादरम्यान बांधण्यात आलेल्या दहीहंडया फोडुन गोविंदोत्सव साजरा केला.

## कर्जतमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी, दहीहंडी उत्सव

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात १६८ सार्वजनिक तर २९० खाजगी अशा ४५८ दहीहंड्या बांधण्यात आल्या होत्या. गावागावात बांधलेल्या गोविंदा पथकांनी फोडल्या. यंदा कर्जत शहरात असलेल्या विविध राजकीय पक्षांच्या वतीने दहीहंड्या बांधल्या आहेत. त्या रात्री उशिरा फोडण्यात येतील.

यंदा दहीहंडीच्या दिवशी सकाळपासून पाऊस असल्याने गोविंदा आनंदात होते. शाळांना सुटी असल्याने चिमुरड्या गोविंदानी सकाळपासूनच गोविंदा खेळायला सुरुवात केली. कमी उंचीवरील दाहीहंड्या त्यांनी फोडून मनसोक्त धमाल केली. सकाळपासूनच गावोगावच्या दहीहंड्या गोविंदानी फोडण्यास सुरुवात केले होती. आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन व कर्जत शिवसेना यांनी कर्जतमध्ये, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष सुरेश टोकरे मित्र मंडळ यांनी तसेच माजी नेरळ मध्ये तर माजी नगरसेवक संतोष पाटील मित्र मंडळ यांनी कर्जतमध्ये मोठ्या रकमेच्या दहीहंडया बांधल्या असून त्या रात्री उशिरापर्यंत फोडल्या नव्हत्या. काही गावांमध्ये मंदिरांमध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सवाचे आयोजन केले होते.




**उरण नगरपरिषद उरण**

**ता. उरण, जिल्हा रायगड, पिन कोड – ४००७०२**

Email ID : uranmunicipal@gmail.com दूरध्वनी क्रमांक : ०२२२७२२२३२०

**उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५**

**जाहीर सूचना**

उरण नगरपरिषद सन २०२५ मध्ये होणा–या सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रारुप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दीची अधिसूचना प्रसिध्द करण्यांचा दिनांक | सोमवार दिनांक १८/०८/२०२५ |
| २. | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना मुख्याधिकारी, नगरपरिषद उरण यांच्याकडे सादर कराव्यात) | सोमवार, दिनांक १८/०८/२०२५ ते रविवार, दिनांक ३१/०८/२०२५ ( दुपारी ३.०० वा. पर्यंत) |

टिप : हरकती व सुचना दाखल करणा–या नागरिकांना सुनावणीकरिता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यांत येईल.

ठिकाण :– उरण
दिनांक :– १८/०८/२०२५

**सही/–**
**(श्री. समीर जाधव)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद , उरण**


# श्रावणसरी नृत्य स्पर्धेत कल्पतरू सखी प्रथम

**कर्जत : प्रतिनिधी**

सुधाकर घारे फाउंडेशन आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या संयुक्त विद्यमाने श्रावणसरी नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कोळी नृत्य सादर केलेल्या हालिवली येथील कल्पतरू सखीने प्रथम क्रमांक पटकवला. यास्पर्धेतील मानाची पैठणी व नथ सांडशीच्या विद्या शिर्के या भगिनीने जिंकली. यामध्ये २१ नृत्य गटांनी भाग घेतला होता.

रॉयल गार्डनच्या सभागृहात श्रावणसरी महा नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नायरा सुर्वे हिने गणेश वंदना सादर केली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस विधानसभा महिला अध्यक्षा ऍड. पूजा सुर्वे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून स्पर्धेचे उदघाट्न करण्यात आले. या वेळी माजी उपसभापती जयवंती हिंदोळा, प्रभावती लोभी, तालुका अध्यक्षा



ॲड. रंजना धुळे, शहर अध्यक्षा मधुरा चंदन, माजी नगरसेविका सुवर्णा निलधे, अश्विनी दिघे, भारती पालकर, सई वारे, कविता शिंगवा, राजश्री कोकाटे, वंदना थोरवे, विमल देशमुख, मनीषा ठोंबरे, मनीषा देशमुख, मनीषा पाटील, आदी उपस्थित होत्या.

तालुका अध्यक्षा ॲड. रंजना धुळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रस्ताविकात स्पर्धेचा उद्देश सांगितला. यास्पर्धेत विविध नृत्य गटांनी नृत्याद्वारे आपली कला सादर केली. त्यामध्ये प्रथम क्रमांक कल्पतरू सखी (हालिवली) यांनी प्रथम क्रमांक मिळविला. द्वितीय क्रमांक जय अंबे भवानी मंडळ (भिसेगाव), तृतीय क्रमांक राजेंद्रगुरु नगर महिला मंडळ ग्रुप (नेरळ) चतुर्थ क्रमांक हवा हवाई ग्रुप (हालिवली) आणि पाचवा क्रमांक राणी लक्ष्मीबाई (नालधे वाडी) यांनी मिळविला. विजयी नृत्य समुहांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. परीक्षक म्हणून अंबरनाथच्या गौरी मानकामे आणि अंजली तिरुमाला यांनी काम पाहिले. अभिनेत्या वृचा गायकवाड आणि कोमल कुंभार यांनी विशेष उपस्थिती दाखवून स्पर्धेकांना प्रोत्साहित केले.

या स्पर्धेला जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, प्रदेश चिटणीस अशोक भोपतराव, भरत भगत, प्रदेश प्रतिनिधी भगवान भोईर, तालुकाध्यक्ष दीपक श्रीखंडे, माजी सभापती एकनाथ धुळे, तालुका युवक अध्यक्ष स्वप्नील पालकर, मधुकर घारे, शहर युवक अध्यक्ष सोमनाथ पालकर,हरीचंद्र निरगुडा, प्रमोद माळी, जयेंद्र देशमुख, प्रकाश पालकर, अविनाश कडू, प्रवीण देशमुख, मंगल ऐनकर, बाबू माळी, विजय म्हात्रे, प्रवीण पाटील आदींनी स्पर्धेला भेट दिली.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ३४/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | पाताळगंगा येथील जुनी व नवीन पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा येथील जुनी व नवीन जलशुद्धीकरण केंद्रातील फिल्टर हाऊसच्या परिचालनाकरीता सेवा पुरविणे. | ₹ ३७,२९,१२०.०० |
| २. | विळे भागड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... विळे भागड येथील जलशुद्धीकरण केंद्रातील क्लोरिनेटरची तीन वर्षांच्या कालावधीसाठी सर्वसमावेशक वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १३,६०,८००.०० |
| ३. | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्राची देखभाल व दुरूस्ती.... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील ई-लेआउट मधील उदंचन गृह व एचएसआरच्या परिचालनाची सेवा एक वर्षाच्या कालावधीसाठी पुरविणे. | ₹ १७,९३,४९६.०० |
| ४. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... रोहा येथील सांडपाणी प्रक्रिया केंद्रातील नव्याने बांधलेल्या संपला सांडपाणी इनलेट कनेक्शन व नव्याने बांधलेल्या संपपासून अस्तित्वातील सांडपाणी निःसारण एचडीपीई वाहिनीला आउटलेट कनेक्शन पुरविणे. | ₹ १८,७९,२४४.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक १९/०८/२०२५ ते दिनांक ०३/०९/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी उपरोक्त कामाबाबत दिनांक २१/०८/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २६/०८/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## निवडक

### बांधकाम साहित्याची चोरी

**पनवेल :** पुष्पक नगर दापोली येथील प्लॉट नं २७७ या ठिकाणावरून अज्ञात चोरट्यांनी हजारो रुपये किमतीचे बांधकामाचे साहित्य चोरून नेल्याची घटना घडल्याने या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या ठिकाणावरून अज्ञात चोरट्याने ५१ हजार रुपये किमतीचे लोखंडी पाईप तसेच ३० हजार रुपये किमतीचे १ टन वजनाच्या गोल रिंग असा मिळून जवळपास ८१ हजार किमतीचा ऐवज चोरून नेला आहे.

### स्वातंत्र्य दिन उत्साहात



**पनवेल :** रेल्वे स्टेशन येथील प.पू. सद्गुरु साई नारायण बाबा आश्रमात देशाचा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा झाला. या वेळी आश्रमाचे सेक्रेटरी रामलाल चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी श्री नारायण बाबा चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष खेमचंद गोपलाणी, राम थडानी, डॉ. शकुंतला भटिजा यांच्यासह शेकडो भाविक व शालेय विद्यार्थी व पालक यांनी राष्ट्रध्वजाला सलामी दिली. त्यांनतर उपस्थित शालेय विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

### बनावट ॲपद्वारे एकाची फसवणूक

**नवी मुंबई :** बँकेचे बनावट मोबाइल ॲप वापरायला भाग पाडून व्यक्तीच्या खात्यातले एक लाख ७२ हजार हडपल्याची घटना घडली आहे. त्यांना बँकेचे व्यवहार करण्यासाठी मदतीच्या बहाण्याने ॲप घेण्यास सांगून त्यांचा ओटीपी मिळवून हा प्रकार घडला आहे. नेरूळ परिसरातील ५० वर्षीय व्यक्तीसोबत हा प्रकार घडला आहे.एकाने त्यांना बँकेचे व्यवहार करण्यासाठी मोबाइल ॲप डाउनलोड करण्याची लिंक पाठवली होती. त्याच्यावर विश्वास ठेवून या व्यक्तीने ते बनावट ॲप मोबाइलमध्ये घेतले असता त्या व्यक्तीने त्यांचा ओटीपी मिळवला.बँकेच्या व्यवहाराचे अधिकार स्वतकडे घेत अज्ञाताने या व्यक्तीच्या खात्यातले एक लाख ७२ हजार रुपये इतर खात्यांत वळवले.

# कॅन्सरमुक्त अभियानाला पनवेलमधून सुरुवात

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सनराईज दरवर्षी मॅमोग्राफी आणि पॅप स्मिअर या शिबीरांचे आयोजन करते. त्यांचे हे सलग चौथे वर्ष आहे. या वर्षीच्या क्लब अध्यक्षा रुपाली रूपेश यादव यांनी अष्टविनायक हॉस्पिटल्स आणि पनवेल मधील इतर काही रोटरी क्लब्स तसेच काही संस्था व समाज यांना एकत्र घेऊन सिनर्जी मध्ये या शिबिराची सुरुवात ३ ऑगस्ट रोजी केली. तसेच सलग दुसरे १५ ऑगस्ट रोजी घेण्यात आले. या अभियानात दोन्ही शिबीरे मिळून आतापर्यंत ७७ महिलांनी डिजीटल मॅमोग्राफी आणि सोनोमॅमोग्राफी तसेच ३९ महिलांनी पॅपस्मिअर करून घेतले.





या शिबिरांत रोटरीचे पनवेल, न्यू पनवेल, पनवेल सिंफनी, पनवेल इलीट, पनवेल महानगर, पनवेल इंडस्ट्रील टाऊन, खारघर मिडटाऊन आणि रोटरी क्लब ऑफ कळंबोली तसेच जाणीव सामाजिक सेवा संस्था आणि अखिल पनवेल तालुका भंडारी समाज इत्यादी संघटनांनी सहभाग घेतला होता. पनवेल सनराईजच्या अध्यक्षा रुपाली यांनी या शिबीराच्या उद्घाटनावेळी हे शिबिर दर महिन्याच्या एका रविवारी घेण्याचे मानस बोलून दाखवले. त्यावेळेस सर्व सिनर्जी पार्टनर क्लब्स आणि जाणीव सामाजिक सेवा संस्थेचे अध्यक्ष विजय गोरेगांवकर यांनी यात सहभाग घेण्यास दुजोरा दिला.

सर्व सिनर्जी पार्टनर्स यांच्या या आवाहनाला अष्टविनायक हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ. अक्षदीप अगरवाल यांनी लगेच होकार दिला. रोटरीच्या या कामात अष्टविनायक हॉस्पिटल नेहमी सर्वोतोपरी मदत करतील, असे सांगितले. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ चे सिनर्जी को डायरेक्टर डॉ. दिपक खोत आणि झोनल को चेअर रो रूपेश यादव यांनी या प्रोजेक्ट साठी सर्व क्लब यांच्याशी संपर्क साधण्यासाठी सनराईजचे अध्यक्ष यांना सहकार्य केले.

क्लब एजी डॉ स्वाती लिखीते, एजी सुरेश शेडगे यांनी ही या शिबीरास सहकार्य केले. सिनर्जी पार्टनर्स क्लबचे अध्यक्ष पनवेल सिंफनी शिवाजीराव पाटील, सुनीता चौधरी, मुकुंद चौधरी, निलेश पोटे, हितेश ठक्कर, डॉ. रविकिरण, पिंकी पंजाबी, दीपा पंजाबी, स्मिता मंडलिक, विजय मंडलिक, प्रसाद पाटील व त्यांचे इतर बरेच क्लब सदस्य उपस्थित होते.

जाणीव सामाजिक सेवा संस्थेचे अध्यक्ष व पनवेल सनराईजचे आयपीपी विजय गोरेगांवकर आपल्या पत्नी अँस वनीता गोरेगांवकर व इतर सदस्यांसह उपस्थित होते. पनवेल सनराईज जाणीव सामाजिक सेवा संस्था, यांनी काही घरगुती काम करणाऱ्या महिला यांच्या तपासण्या पुरस्कृत केल्या होत्या तसेच पुढील होणाऱ्या शिबीरासाठी आरसी पनवेल आणि आरसी पनवेल सिंफनी यांनी घरकाम सेवा देणाऱ्या गरजू महिलांना पुरस्कृत केले आहे.

या अभियानाचे पुढाकार घेणाऱ्या क्लबचे अध्यक्ष रुपाली रूपेश यादव यासमवेत क्लबचे रुपेश यादव, बाळकृष्ण आंबेकर, विजया आंबेकर, मधुकर नाईक, काशीराम पाटील आणि दिलीप जाधव, अर्चना जाधव आदी उपस्थित होते. ही शिबिरे यशस्वी होण्यासाठी न्यू पनवेल खांदा कॉलनी येथील अष्टविनायक हॉस्पिटल्सच्या महिला डॉक्टर, नर्सेस, रिसेप्शन आणि इतर पॅरामेडिकल स्टाफने विशेष मेहनत घेतली.

क्लबचे प्रेजिडेंट इलेक्ट काशीराम पाटील यांनी सर्व सिनर्जी पार्टनर्स, सहयोगी संस्था, सहयोगी हॉस्पिटल यांचे पनवेल सनराईजच्या वतीने आभार व्यक्त केले आणि पुढील महिन्यापासून दर महिन्यात घेण्यात येणाऱ्या शिबीरांसाठीही अशीच जास्तीत जास्त गरजू महिलांची नोंद करतील असा विश्वास व्यक्त केला.

## कोयनावेळे येथे रोपांचे वाटप आणि वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून भारतीय जनता पक्ष, कोयनावेळे भाजप बूथ क्रमांक ५४ यांच्या वतीने सिद्धीविनायक प्रतिमा, कोयनावेळे येथे ७५ रोपांचे वाटप व वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



या कार्यक्रमाला सोसायटीमधील तसेच परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने हजेरी लावली. यावेळी पनवेल उत्तर तालुका मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर यांची विशेष उपस्थिती लाभली.

तसेच ज्येष्ठ नागरिक श्री जयराम मारुतीराव कदम (माजी सरपंच, कोयनावेळे), विनेश विश्रामराव कदम (कोषाध्यक्ष, पनवेल उत्तर तालुका मंडळ), रमेश यशवंतराव कदम (माजी सैनिक सेल अध्यक्ष, पनवेल उत्तर तालुका मंडळ), भूपेश चव्हाण (सर), श्री सुशांत कदम, विठ्ठल भाऊ वाव्हळे तसेच कोयनावेळे येथील सर्व भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्व सिद्धीविनायक प्रतिमा सोसायटी रहिवाश्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल व प्रेमाबद्दल भाजप कोयनावेळेतर्फे आभार मानण्यात आले.





**पनवेल : बामणडोंगरी गावात श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी करण्यात आली. यामध्ये सर्व गावकरी उत्साहाने सहभागी झाले होते.**

## फसवणूक करणाऱ्यांवर गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

कांदा या शेतीमालाची ऑर्डर देऊन चांगले पैसे कमवून देतो, असे आमिष दाखवून २६ लाख २४ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी पियूष गोहेल आणि नेहा पियूष गोहेल (रा. गांधीधाम, गुजरात) यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सविता राहुल खैरनार या आसूडगाव येथे राहतात. त्यांचा शेतीमाल ट्रेडिंगचा एक्सपोर्ट-इम्पोर्टचा व्यवसाय आहे. त्यांना फोनवरून, ई-मेलवरून भारतातून व परदेशातून शेतीमाल कांदा खरेदी करण्यासाठी व्यापाऱ्यांच्या ऑर्डर येत असतात. त्यामुळे त्या कांदा सप्लाय करतात. २०२० मध्ये त्यांना पियूष गोहेल यांचा फोन आला आणि त्यांची पत्नी नेहा गोहेल हिच्या नावे कंपनी असल्याचे सांगितले व कांदा योग्य किमतीत द्या, असे सांगून त्यांना फोटो, व्हिडीओ पाठवण्यात आले. या वेळी त्यांना२०२३ मध्ये पियूष आणि नेहा यांनी कांद्याची ऑर्डर दिली. कंटेनरमध्ये कांदा भरून पावती देऊन कांदा खरेदी केला. त्यानंतर ऑर्डरचे पैसे त्यांनी बँकेत रोख स्वरुपात दिले.उधारीवर माल द्यावा लागेल, तुमचे पैसे एक महिन्यात परत करतो, असे सांगितले. त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांनी मे २०२३ मध्ये तब्बल २६ लाख २४ हजार २७७ रुपयांचा कांदा दिला.

एक महिन्यानंतर सविता यांनी त्यांच्याकडे कांद्याच्या पैशांची मागणी केली असता, त्यांनी पैसे देणार नाही, तुम्हाला काय करायचे ते करा, अशी खैरनार यांजी धमकी दिली. या प्रकरणी सविता खैरनार यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

# करंजाडे वसाहतीत ऑपरेशन सिंदूरला समर्पित दहीहंडी

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे वसाहतीत ऑपरेशन सिंदूरला समर्पित दहीहंडी उत्सव आकर्षण राहिली. करंजाडे शैक्षणिक सामाजिक विकास मंडळ आयोजित माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या माध्यमातून आयोजित केलेली दहीहंडी उत्साहात पार पडली. या वेळी या मानाची दहीहंडी पनवेल कोळीवाडा येथील जय महाराष्ट्र शिवतेज व्यायाम शाळा पनवेल कोळी समाज या पथकाने दहीहंडी फोडली.

या वेळी कार्यक्रमाला आमदार विक्रांत पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष उद्योजक जे. एम म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी नगरसेवक नितीन पाटील, गणेश कडू, संदीप पाटील, सुनील बहिरा, विनोद साबळे, निलेश पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे,



पनवेल (प) मंडळ अध्यक्ष भाजपा रूपेश धुमाळ, गजानन पाटील, समीर केणी, कुणाल लोंढे, रिल्स स्टार साक्षी देशमुख, निखिल भोपी यांच्यासह भाजप पदाधिकार, कार्यकर्ते यांच्यासह अनेक मान्यवरांनी हजेरी लावली.

माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, यांच्या माध्यमातून ऑपरेशन सिंदूर या विषयावर दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी मुंबई, ठाणे, कर्जत, पनवेल, नवी मुंबईतील सुमारे २० ते २५ दहीहंडी पथकाने चार, पाच, सहा थरांची सलामी दिली. या वेळी सलामी देण्याऱ्या पथकाचे आयोजकांच्या वतीने सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर यावर्षी जय महाराष्ट्र शिवतेज व्यायाम शाळा पनवेल कोळी समाज पथकाने सलामी देत करंजाडेतील ऑपरेशन सिंदूरला समर्पित असलेली दहीहंडी फोडली.

## शाळांमध्ये ज्ञानेश्वर महाराज पालखी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांचे सन २०२५ वर्ष हे सप्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी (७५०) जयंती वर्ष आहे. शासन निर्देशाप्रमाणे १५ ऑगस्ट २०२५ रोजी पनवेल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेच्या शाळांमध्ये पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आज सर्व शाळांमध्ये पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी संत ज्ञानेश्वर महाराजांची प्रतिमा व ज्ञानेश्वरी ग्रंथ पालखीत ठेवून टाळ मृदुंगाच्या गजर करत पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. शेवटी पसायदान म्हणून, पसायदानाचा अर्थ शिक्षकांमार्फत सांगण्यात आला. सर्व मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात आनंदाने सहभाग घेतला.



**खारघर : आमदार प्रशांत ठाकूर यांनी श्री कच्छ कडवा पाटीदार समाज आयोजित जन्माष्टमी उत्सव कार्यक्रमात उपस्थित राहून सर्वांना जन्माष्टमीच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्यासोबत उत्तर रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, संतोष शर्मा, नितेश पाटील आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.**

## पनवेल-उरण आगरी समाज मंडळाच्या प्रांगणात ध्वजारोहण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल उरण आगरी समाज मंडळ पनवेलच्या महात्मा फुले सभागृहाच्या प्रांगणात शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५ रोजी भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. सकाळी १० वाजता कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास व राष्ट्रीय नेत्यांच्या तसबिरींना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मंडळाचे अध्यक्ष अतुल दि.बा.पाटील यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी जनजागृती ग्राहक संघटनेचे अध्यक्ष काशिनाथ ल. जाधव उपस्थित होते त्यांनी स्वातंत्र्याचे महत्त्व व त्याकरिता अनेकांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य अधोरेखित केले. त्यानंतर अतुल दि.बा. पाटील यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्व सांगितले व स्वातंत्र्यामुळे होत असलेला विकास सर्व गोरगरीबांपर्यंत पोहचवा, असे सांगितले.



या कार्यक्रमास मंडळाचे सचिव बी.पी म्हात्रे, कोषाध्यक्ष विजय द. गायकर, कार्यकारिणी सदस्य कमलाकर पवार, हेमंत पाटील, मेघा तांडेल, मनिषा अतुल पाटील, सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे सचिव शिवदास पालकर, सहसचिव स.क. पाटील, आ.बा. पाटील, आगरी दर्पणचे सहव्यवस्थापक शाम मोकल, डी.बी. पाटील, शशिकांत पाटील, कर्मचारी विद्याधर पाटील, अरुण म्हात्रे, गणेश, शुभश्री पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन संस्थेमध्ये स्वातंत्र्य दिन



**नवी मुंबई : बातमीदार**

राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था, (दिव्यांगजन) प्रादेशिक केंद्र नवी मुंबईने शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५ रोजी हर घर तिरंगा या थीम वर ७९ वा स्वातंत्र्यदिन साजरा केला.

डॉ. रवि प्रकाश सिंग, प्रभारी अधिकारी राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था प्रादेशिक केंद्र, नवी मुंबई, सन्मानीय अतिथी डॉ. वेणुगोपाल वेंकटराम, रोटरी क्लब सनराइज अमीर सुमार, अध्यक्ष, आगा खान सोशल वेल्फेअर बोर्ड फॉर वेस्टर्न इंडिया तसेच रचना त्रिवेदी, इनर व्हीलच्या सदस्या उपस्थित होते. संस्थेचे प्रभारी अधिकारी डॉ.रवी प्रकाश सिंह आणि सन्मानिय अतिथी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. दिव्यांग विद्यार्थी, शिक्षक प्रशिक्षणार्थी आणि संस्थेच्या शिक्षकांनी सामूहिक गायन, एकल गायन, समूह नृत्य, वाद्य वादन यासह सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

डॉ. रवि प्रकाश सिंह यांनी सांगितले की, राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था, (दिव्यांगजन) प्रादेशिक केंद्र नवी मुंबई संस्था दिव्यांगजनांपर्यंत आपल्या सेवांचा विस्तार करण्यास सक्षम आहे, आणि संस्थेने दिव्यांगजन चे पुनर्वसन आणि आरोग्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. तसेच राष्ट्राच्या प्रगतीसाठी आणि दिव्यांग मुलांच्या जीवनात स्वावलंबी होण्यासाठी त्यांचे पुनर्वसन करण्याची गरज अधोरेखित केले. या संपूर्ण कार्यक्रमामध्ये संस्थेतील कर्मचारी, प्रशिक्षणार्थी, दिव्यांग मुले त्यांचे पालक यांनी उत्स्फूर्त पणे सहभाग घेतला.

राम प्रहर

श्रावणधारा

### श्रावण माझ्या दारी

आनंदाच्या घेऊन लहरी,
आला श्रावण माझ्या दारी।।धृ।।

काळे नभ सूर्यास ग्रासती
हळूच धरतीवरी बरसती
मग किरणांना वाट दाविती
प्रकाश छान पसरतो सोनेरी ।।१।।

अंगोपांगी झरे नाचवूनी
तृप्त झाली जलधार पिऊनी
पृथ्वी रमली रोपे रुजवूनी
पाहतो सौभाग्य सुंदरी।।२।।

ऐकू कहाणी अध्यात्माची
देव देवता विविध व्रतांची
कामे करू आपण पुण्याची
पूजतो महादेव सोमवारी ।।३।।

सागराची श्रीफल पौर्णिमा
राखी जागवे बंधूप्रेमा
अष्टमीला कृष्ण चंद्रमा
जन्मला हरी कारागारी ।।४।।



-प्रवीण देशमुख, कल्याण

# रोह्यातील दहीहंडीत लागले आठ थर



## मानाची हंडी रोठ खुर्द व किल्ला गोविंद पथकाने फोडली

**रोहा : प्रतिनिधी**

हजारो रोहेकरांच्या साक्षीने तालुक्यातील श्री वाकेश्वर गावदेवी गोविंदा पथक किल्ला व जयभवानी गोविंदा पथक रोठ खुर्द यांनी आठ थर लावून शहरातील मानाची दहीहंडी फोडली.

खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या संकल्पनेतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष रोहा आणि सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान आयोजित कुंडलिका नदी संवर्धन पार्किंग येथे दहीहंडी स्पर्धेचा थरार पहावयास मिळाला. या दहीहंडी स्पर्धेत महिला गोविंदा पथकांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

कुंडलिका नदी संवर्धनचे भव्य पटांगण, प्रेक्षकांना बसण्यासाठी गॅलरी, डीजेवर गीत व नृत्यांची सांस्कृतिक मेजवानी अशी भव्य दिव्य दहीहंडी झाली. यादरम्यान डीजेच्या तालावर कोळीगीत, लावणीसह विविध गीतांवर गोविंदा थिरकले. हजारो रोहेकरांनी गोविंदाचा थरार पाहिला.

या दहीहंडी उत्सवात एकूण ६२ गोविंदा पथकांनी सहभाग घेतला. यामध्ये ३९ तालुक्यातील व २३ जिल्हाबाहेरील पथके होती. २० पथकांनी सात थर, ११ पथकांनी सहा थर लावले. महिलांनीसुद्धा आम्ही मागे नाही हे पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले. नऊ महिला पथकांनी पाच थर, तर १० महिला पथकांनी चार थर लावले.

श्री वाकेश्वर गावदेवी गोविंदा पथक किल्ला व जयभवानी गोविंदा पथक रोठ खुर्द यांनी आठ थर लाऊन मानाची हंडी फोडण्याचा मान मिळवला आहे. विजेत्या गोविंदा पथकांना मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजय मोरे यांच्यासह इतर मान्यवर व कार्यकर्त्यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आली.

# नेरळ मंडळातून देवाभाऊंना राख्या



**कर्जत : रामप्रहर वृत्त**

महिला सक्षमीकरणासाठी देवाभाऊ अर्थात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र सरकारमार्फत राबविलेल्या योजनांमुळे महिलांना जो आधार मिळत आहे तसेच लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून बहिणींना मिळणाऱ्या मदतीबद्दल एक राखी कृतज्ञतेची एक राखी देवाभाऊंसाठी उपक्रम साजरा होत आहे.

या अंतर्गत भाजप नेरळ मंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष नरेश मसणे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळातील ८३ बुथवर राखी संकलनाचे काम महिला मोर्चा अध्यक्ष नम्रता कांदळगावकर यांनी मंडळातील सर्व महिला कार्यकर्त्यांकडून घराघरात जाऊन करून घेतले.

राखी पौर्णिमेनिमित्त देवाभाऊ अर्थात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी राखी संकलनाचे काम पूर्ण महाराष्ट्रभर सुरू आहे. प्रत्येक घराघरामध्ये जाऊन महिलांसाठी सरकारच्या सर्व योजनांची पुस्तिका पोहचवली आणि भगिनींकडून राखी आणी संदेशपत्र जमा होत आहे.

या अंतर्गत १६ ऑगस्ट रोजी नेरळ येथील नितीन कांदळगावकर यांच्या कार्यालयात राख्या संकलन करण्यात आले. संकलित केलेल्या सर्व राख्या मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याकडे पनवेल येथील उत्तर रायगड जिल्हा कार्यालयात पोहचवण्यात आल्या.

राखी संकलनासाठी सर्व बूथ अध्यक्ष, शक्तिकेंद्र प्रमुख, श्रद्धा कराळे, मृणाली शेळके, सुप्रिया भगत, कांता निमणे, प्रतिभा घावरे, साधना जाधव, सुहासिनी शिंदे, समिधा टिल्लू, निशा भोईर, मयुरी मसणे यांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी माजी तालुका अध्यक्ष राजेश भगत, मंगेश म्हसकर, नितीन कांदळगावकर, किरण ठाकरे, सरचिटणीस वैभव भगत, नरेंद्र कराळे, जिल्हा परिषद अध्यक्ष धनाजी गरूड, विठ्ठल भागीत, रामदास तुपे, पंचायत समिती विभागीय अध्यक्ष धनंजय थोरवे, प्रल्हाद राणे, दीपक शेकटे, संतोष शिंगाडे, गुरूनाथ सोनावळे; त्याचसोबत सर्व सेल, मोर्चांचे पदाधिकारी, मंडळातील सर्व पदाधिकारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.



# कर्जतमधील शिबिरात ५२ जणांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

कन्झ्युमर प्रोडक्ट्स डिस्ट्रिब्युटर्स असोसिएशन कर्जत–नेरळ आणि रायगड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय स्वातंत्र्य दिवस तसेच कन्झ्युमर प्रोडक्ट्स डिस्ट्रिब्युटर्स असोसिएशनच्या अकराव्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिरात ५२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी कर्जत–खालापूर तालुक्यात आयोजित केलेले हे ५२०वे रक्तदान शिबिर ठरले.

कर्जत शहरातील शनी मंदिराच्या रवि किरण सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते तसेच कर्करोग तपासणी शिबिरही घेण्यात आले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उदघाटन झाले. या वेळी राकेश परमार, नरेंद्र बोराडे, मुकेश कटारिया, रवींद्र हिंगड, जिग्नेश शहा, अजय झुंजारराव, सचिन पटेल, प्रशांत शहा, केतन शहा, जिमेश पटेल, कैलास पोटे, सुनील भोपतराव, डॉ. आशुतोष कुळकर्णी, डॉ. मनिष परमार, डॉ.रितेश ओसवाल, डॉ. कुमार ओसवाल आदी उपस्थित होते.

सतीश पिंपरे यांनी सर्वप्रथम रक्तदान करून रक्तदानाचा शुभारंभ केला. एकूण ५२ जणांनी रक्तदान केले. माया रक्त केंद्र बदलापूरच्या प्रियांका धईनजे, श्वेता बागुल, राज पारधी, रोहिणी मॅडम, मनिषा भिसे आदींनी रक्त संकलनाचे काम केले.

# रेवदंड्याच्या दर्श नागोटकरची निवड




**रेवदंडा : वृत्तसंस्था**

ओएसिस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था रेवदंड्याचा स्वयंसेवक समन्वयक दर्श नागोटकर याची देशाची राजधानी नवी दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्वातंत्र्य दिन सोहळ्यात सन्मानीय युवा सामाजिक अतिथी म्हणून निवड झाली.

२० वर्षीय दर्श हा गीता तटकरे पॉलिटेक्निकल कॉलेज, कोलाड (रोहा) येथे शिक्षण घेत असून शिवमर्दानी पारंपरिक क्रीडा प्रकार आणि मलखांब याविषयी त्याला विशेष रूची आहे. कमी वयातील तो मलखांब तसेच पारंपरिक क्रीडा प्रकाराचा प्रशिक्षकसुद्धा आहे.

दर्श केंद्र सरकार अंतर्गत क्रीडा व युवा कार्यक्रम मंत्रालय संचालित मेरा युवा भारत अलिबाग–रायगडचा सक्रिय स्वयंसेवक आहे. जिल्हा युवा अधिकारी अमित पुंड यांच्या मार्गदर्शनाखाली त्याची निवड झाली.

# स्वातंत्र्यदिनी महिला मंडळाने केले वृक्षारोपण



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील रोवळा येथील जानकी महिला मडळानी श्रीराम मंदिराला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याने श्रीकृष्ण जन्मोत्सव व स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून गावातील रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यत आले तसेच मंदिर व शाळा परिसरातही वृक्ष लावले.

या वृक्षारोपणासाठी महिला मंडळाच्या अध्यक्ष प्रियांका नाखरेकर, सचिव उज्वला शेंडगे, कल्पना घाडगे, नितीशा तांदळेकर आदी महिला सहभागी झाल्या होत्या. वृक्षारोपणामुळे गावाला शोभा येऊन पर्यावरणाला यामुळे हातभार लागेल. यामध्ये आंबा, काजू, चिकू, गुलाब, जास्वंदी इत्यादी झाडे महिलांनी लावली. ही रोपे स्वतः महिलांनी आणली होती तसेच ती जगविण्याचा निर्धार त्यांनी केला आहे.

## दहीहंडीत माकडांची चंगळ



मुरुड : गोपाळकाला उत्सव सुरू असताना मुरुडमध्ये माकडांनी धमाल उडवून दिली. बाजारपेठेतील आझाद चौकात राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे दहीहंडी बांधण्यात आली होती. या दहीहंडीभोवी विविध प्रकारची फळे लावण्यात आली होती. पेरू,सफरचंद, संत्री आदी फळे लटकवण्यात आली होती. या फळांचा वास माकडांना लागताच त्यांनी एका दोरीवरुन प्रवास करीत टांगलेली फळे खाऊन टाकली व ते पुन्हा झाडाच्या उंच टोकावर निघून गेले.

# नव्या प्रकल्पांमुळे रोहा अष्टमीच्या सौंदयात भर; देखभालीचीही गरज

**रोहा : प्रतिनिधी**

राजकीय इच्छाशक्ती, विकासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व प्रशासन यंत्रणेचे काम करण्याचा दृष्टिकोन यामुळे रोहा अष्टमी शहराचा कायापालट होताना दिसत आहे. अनेक प्रकल्प रोहा अष्टमीत येत असल्याने शहराच्या सौंदर्यात भर पडताना दिसत आहे. मूलभूत गरजा पूर्ण होत असताना भौतिक गरजा याही महत्त्वाच्या आहेत. हाच शहराचा विकासाचा रोल मॉडेल असल्याने याकडे रोहा अष्टमीची वाटचाल होताना दिसत आहे.

खासदार सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून रोहा अष्टमी शहराचा विकास होत असताना महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून अनेक नवीन प्रकल्प येत आहेत. या माध्यमातून शहराच्या सौंदर्यात भर पडताना दिसत आहे. विकास होत असताना मूलभूत गरजाही महत्त्वाच्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने पाणी, वीज, आरोग्य त्यानंतर भौतिक गरजांचा विचार होत असतो.





रोहा अष्टमी शहरातील अध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाचे असलेल्या मंदिरांचा जीर्णोद्धार होऊन नव्याने उभारण्यात येत आहेत, तर काही मंदिरे जिल्ह्यातील आकर्षणबिंदू ठरणारे होत असताना भविष्यातही काही मंदिरे कल्पकतेतून मंदिरे उभारली जाणार आहेत.

रोहा अष्टमी शहराच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या कुंडलिका नदी संवर्धन, शिवस्मारक, हनुमान टेकडी सोशोभीकरण, रोहा अष्टमीतील अद्ययावत होत असलेले उद्याने ही शहराच्या सौंदर्यात भर टाकणारी प्रकल्प आहेत.

शहराचा विकास हा दळणवळणावर अवलंबून असतो. शहरातील रस्ते विकासाचे महत्त्वाचा टप्पा मानला जातो. रोहा शहरातून जाणारा रोहा–कोलाड मार्ग हा अद्ययावत झाल्याने प्रवाशांना व पर्यटकांना प्रवास करताना सुखकर होताना दिसत आहे. या रस्त्यालगत असलेले गटारे व मधली जागा सुसज्ज होणे आवश्यक आहे. नागरिक व प्रशासनाकडून वाहनतळांचे लगतच्या बाजूला नियोजन केल्यास सुसज्ज असा हा मार्ग बनणार आहे. रस्त्याला डिव्हायडर टाकून पथदिवे लावण्यात आले आहेत. हे पथदिवे रोहाच्या सौंदर्यात भर टाकणारे ठरत आहेत. जड, वाहनांना पर्यायी बायपास रस्ता उपयुक्त ठरल्याने काही प्रमाणात शहरातील वर्दळ कमी झालेली दिसून येते.

रोहा–नागोठणे मार्गावरील अष्टमी रेल्वे गेटवरील उड्डाणपूल लवकरच होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे नागरिकांना होणारा त्रास वाचणार आहे. याचे काम संथ गतीने चालू आहे. या कामाला चालना मिळण्याची आवश्यकता आहे. याच मार्गावर अष्टमीपर्यंत मुख्य रस्ता दुरूस्त करण्याची गरज आहे. दोन्ही शहरातील काही रस्ते दुरुस्ती आले आहेत, तर काही दुरुस्ती होणे आवश्यक आहे. या विकासकामात सहकार्याची भूमिका शिवसेना व भाजपची असल्याचेही दिसून येते.

खासदार तटकरे यांच्या संकल्पनेतून उभे राहिलेल्या हनुमान टेकडीचे सुशोभीकरण व लावण्यात आलेले दिवे शहराच्या सौंदर्यात रात्रीचे भर टाकणारे दिसत आहेत. मनमोहक नजारा या परिसरात दिसतो.

आरोग्याच्या दृष्टिकोनातून जिल्हा उपरुग्णालय फायदेशीर ठरत असताना खासदार तटकरे यांच्या संकल्पनेतून रोहा शहरात व नजीकच्या रोठ खुर्द होत असलेले अद्ययावत रुग्णालयाच्या प्रतीक्षेत रोहेकर आहेत. महिला व बालकल्याण मंत्री यांच्या प्रयत्नातून अष्टमी येथील अद्यावत रक्तपेढी नागरिकांच्या सेवेस सुरू झाली आहे.

राज्य सरकार व रेल्वे बोर्डाच्या माध्यमातून रोहा रेल्वे स्टेशन अद्ययावत करण्याचे भूमिपूजन करण्यात आले आहे. याचे काम लवकरात लवकर सुरू करून पूर्ण करण्यात यावे. अद्ययावत रेल्वे स्टेशनच्या या प्रतीक्षेत प्रवासी व रोहेकर आहेत. रेल्वेचा विकासात महत्त्वपूर्ण भूमिका असते. त्यामुळे जलद लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा मिळणे आवश्यक आहे.

शहरातील नागरिकांच्या व युवकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून व्यायामशाळा, शहरात होत असलेल्या योग क्लासेस महत्त्वाचे आहे. ज्या बाबीकडे विशेष लक्ष माजी आमदार अनिकेत तटकरे यांचे आहे. भुवनेश्वरमध्ये होत असलेल्या क्रीडांगण खेळाडूंना फायदेशीर ठरणार आहे. याचे काम सध्या सुरू आहे. मानवी जीवनात निखळ आनंद आवश्यक असतो. या दृष्टिकोनातून रोहा शहरातील नाट्य, कला व सांस्कृतिक चळवळीचा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी उभे राहत असलेले नाट्यगृह हे रसिकांना पर्वणी ठरणार आहे.

युवकांना आपली कला, कौशल्य या माध्यमातून रोजगार निर्मिती व्हावी या दृष्टिकोनातून खासदार तटकरे यांच्या संकल्पनेतून टाटा, एमआयडीसी व रोहा अष्टमी नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने रोहा येथील टाटा संचलित कौशल्यवर्धन (सीआयआयआयटी) केंद्र युवकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. स्पर्धा परीक्षा साठी चाललेले प्रयत्नही युवकांसाठी लाभदायक ठरणार आहेत.

शहरातील स्वच्छता, रस्ते, नव्याने उभे राहत असलेल्या वास्तू याकडे सातत्याने लोकप्रतिनिधींसह शासकीय यंत्रणेने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. वास्तू उभ्या राहत असताना देखभाल करणेही महत्त्वाचे आहे.







उरण : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने उरण येथे भाजपच्या वतीने महारोजगार मेळाव्याचे आयोजन रविवारी करण्यात आले होते. मेळाव्याचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे आदी उपस्थित होते.








पनवेल : भाजप पनवेल शहर मंडळाने आयोजित केलेल्या आमदार चषक दहीहंडी उत्सव २०२५मध्ये मैत्री गोविंदा पथकाने ऐतिहासिक कामगिरी करत पनवेलमध्ये प्रथमच आठ मानवी थरांचा मनोरा रचून हंडी फोडण्याचा मान पटकावला. या उत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवरांची तसेच नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली.











उलवे नोड : भाजप व महिला मोर्चा उलवे नोडच्या वतीने भव्य दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला होता. या उत्सवाचा प्रारंभ भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते पूजन करून करण्यात आला. ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी या दहीहंडी उत्सवास भेट देऊन आयोजक, गोविंदा पथके यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते, माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य, विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक, गोविंदा पथकातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. अरुणशेठ भगत यांनी शेलघर येथे महेश स्पोर्ट्स आणि सचिनशेठ घरत प्रतिष्ठानच्या दहीहंडी सोहळ्यासही भेट देत बक्षिसांचे वितरण केले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com